कृपेची साऊली....
माऊली माझी

लेखक स. फ. आजगांवकर

संपादक
गुं. फ. आजगांवकर

बसलेले डावीकडून : कै. **फ. र. प्रभु आजगांवकर** (वडील)
कै. **शिवराम बाळकृष्ण सामंत** (आजोबा)
कै. **शांताबाई फ. आजगांवकर** (मातोश्री).

उभे डावीकडून : **स. फ. आजगांवकर** (बंधू) **श्री. रा. शि. सामंत** व **गुं. फ.**
(फोटो १९३७)

कृपेची साऊली माऊली माझी

: लेखक :

स. फ. आजगांवकर
सावंतवाडी

संपादन : प्रकाशन
गुं. फ. आजगांवकर
प्रबोधन रिसर्च असोशिएट्स
१७ के. जी. बी. निवास, गिरगाव, मुंबई ४०० ००४

प्रकाशक : **गुं. फ. आजगांवकर**
१७ के. जी. बी निवास
गिरगांव, मुंबई ४०० ००४

प्रसिद्धी : जून १९८४

२ रुपये

मुद्रक : **य. गो. म्हात्रे**
नरेश मुद्रणालय, अलिबाग
जि. रायगड

माझे परमपूज्य वडील

कै. फ. र. प्रभू आजगांवकर

यांचे स्मृतीस

हे पुस्तक

सप्रेम अर्पण

—सद्‌गुरु प्रभू

कृपेची साऊली माऊली माझी

' मातृ देवो भव– न मातुःपर दैवतम् ' अशा वचनानी आईची थोरवी वर्णिली जाते. मातृहृदयात, आपल्या मुलांबद्दलचे प्रेम अखंड वास्तव्य करून असते. त्या प्रेमात स्वार्थ नसतो. मुलांच्या कल्याणासाठी आई सतत कष्ट करीत असते.

मुलांच्या शिक्षणाची, संगोपनाची, चारित्र्याची सतत काळजी वाहते. मुलांचा खरा शिक्षक त्यांची आई होय. आईच्या वळणावर मुले जातात. त्यांची आई हाच त्यांचा पहिला आदर्श. माझी आई ही एक आदर्श माता, आदर्श मुलगी, आदर्श शेतकरी आणि आदर्श कुटुंबवत्सल स्त्री होती. माझ्यावर आणि माझ्या भावावर आईच्या थोर शिक्षणाचा, तिच्या उदार हृदयाचा, गोरगरिबांच्या दुःखाने विरघळणाऱ्या तिच्या सहानुभूतिपूर्ण स्वभावाचा खोलवर परिणाम घडवून आणलेला आहे. तिची जेव्हा जेव्हा आठवण येते तेव्हा तेव्हा डोळ्यात अश्रू उभे राहातात. तिने आयुष्यभर जे कष्ट उपासले त्यांची तुलना मला करताच येत नाही. म्हणूनच रस्त्यावर एखादी अनाथ स्त्री जेव्हा मदतीसाठी उभी असलेली मी पाहतो तेव्हा त्या स्त्रीत मला माझ्या आईचा भास होतो. स्त्रियांबद्दलची आणि विशेषतः वयातीत स्त्रियांबद्दलचा माझ्या ठायी असलेला आदरभाव हा माझ्या आईच्या स्मृतीचाच एक भाग आहे. माझी आई कुत्र्या-मांजरावर, पक्ष्यांवर, वृक्षराजीवर मनापासून प्रेम करी. घरातील अन्न त्यांच्यापुढे ठेवी. महारवाड्यातील स्त्रिया पुष्कळदा आमच्या दारात अन्नासाठी हाका देत. अशा वेळी स्वतः उपाशी राहूनही माझी आई त्याना जेवण देत असलेली मी अनेकदा पाहिली आहे. सत्यवचनी आणि सत्यवाणी असा तिचा व्यवहार असे. ती लबाड लोकांचा मुलाहिजा ठेवत नसे. गावात ती ' शांता आत्या ' म्हणून ओळखली जाई. आजही तिचे नाव घेताना लोक आदराने स्मरण करतात. माझ्या आईची स्मृती मागे रहावी म्हणून माझ्या बंधूने– सद्गुरूने ज्या आठवणी लिहून काढल्या; त्या त्याच्या षष्ठ्यब्दी समारंभाच्या निमित्ताने मी

प्रकाशित करीत आहे. आईबद्दलची कृतज्ञता व्यवत करण्याची ही सुसंधी सद्गुरूच्या कृपेने मला प्राप्त झाली. माझी आई मोठी भाग्यवान ! तिला आमच्यासारखे मातृभक्त मुलगे लाभले. जगात अशा किती दु:खी माता असतील की, ज्याना मुलांचा एक सुखाचा शब्द मिळणेही कठीण असेल. आज काळ बदलत आहे. मातेच्या पवित्र प्रेमाची उपेक्षा होत आहे.

माझ्या आईचा जन्म सन १८९७ मध्ये तांबोसे ह्या छोटयाशा गावी झाला. बांदा आणि पेडणे हे दोन आठवडयाच्या बाजाराचे गाव. तोरसे, मोप, उगवे ह्या गावामध्ये तांबोसे आहे. सामंत, देसाई, बोडणकर, हरिदास, पाटील, गव्हाणकर, मातोंडकर ह्या आडनावाची बरीच गौड ब्राह्मण घराणी तेथे होती. जमीन दुपिकी आणि भरपूर पाणी असलेली आहे. दाड हे ग्रामदैवत, ब्राह्मणी हे देवीचे देऊळ. शिवाय दत्ताचे व विठोबाचे अशी मंदिरे आहेत. आमच्या लहानपणी लोकात प्रामाणिकपणा, एकी, आपलेपणा, स्नेह फार होता. लोक पाप-भीरू होते. कीर्तन, भजन, आणि जत्रा ह्या प्रसंगी लोक एकत्र जमत. गरजा कमी होत्या; लोक सुखी होते. समाधान आणि शांती याचे साम्राज्य होते. रस्ते नव्हते, वाहने नव्हती, वीज नव्हती, शिक्षणाच्या सोई नव्हत्या. एक (खाजगी) प्राथमिक शाळा होती.

शिवराम बाळकृष्ण सामंत हे माझ्या आईचे वडील. त्यांचे आपल्या मुलीवर फार प्रेम. घरचा सर्व व्यवहार तीच चालवी. ती सर्वात वडील त्यामुळे दोन बहिणी आणि एकुलता एक भाऊ यांची जबाबदारी आईवर पडली. आईला मूळाक्षरांची चांगली ओळख होती. पहिले धडे मला आईनेच दिले. इ. सन. १९०९ मध्ये म्हणजे वयाच्या १२ व्या वर्षी तिचा विवाह आजगांवचे एक वतनदार फ. र. प्रभू आजगांवकर यांचेशी झाला. त्यांचे शिक्षण मराठी सात व इंग्रजी तीन इयत्ता झाले होते. त्यानी गोव्यात दाबाल येथे मराठी शाळा स्थापन केली, ती काही वर्षे चालविली. मुंबईस तुकाराम लक्ष्मण यांच्या दुकानी कारकुनी केली व पुढील आयुष्यात ज्योतीषव्यवसाय केला. काहीकाळ गोव्यात काजू कारखान्यात मॅनेजर म्हणून राहिले. आजगावहून चालणाऱ्या 'प्रणाम' ह्या पाक्षिकाचे ते संपादक होते. २२ जुलै १९६१ मध्ये आजगाव येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांचे वार्धक्याने निधन झाले.

माझ्या आईची आई रुक्मिणी. तिला लोक गजाबाई या नावाने संबोधीत. तांबोसे येथील दादा पाटकर यांची ती मुलगी. हे पाटकर घराणे तूर्त बांद्यास व म्हापसे येथे स्थायिक झाले आहे. सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. काशीनाथ लक्ष्मण पाटकर, पेढीवाले हे याच घराण्यातील.

माझी आई व तिची आई ह्या दत्तभक्त होत्या. आजगांव येथेही आमच्या घरी दत्तजयंती थाटाने होते. आई उपासतापास, व्रतवैकल्ये फार करी. सोवळे ओवळे कडकपणे पाळी. घरी येणाऱ्या कोणाही माणसास जेवण घातल्याशिवाय आणि रिकाम्या हाताने ती कधीच पाठवीत नसे. ती मुक्त हस्ताने दानधर्म करी. आपण असे केले तर आपल्या मुलाबाळांस ती कुठेही असली तरी पोटापाण्याला मिळत राहील, असा तिचा ईश्वरावर भरवसा होता.

आईला एकटे राहाणे आवडत नसे. पण आयुष्याच्या उत्तर काळात आम्ही दोघे पोटापाण्यासाठी बाहेर पडलो. आमची लग्ने झाली आणि आईला गावी एकाकी रहावे लागले. त्यामुळे ती फार दुःखी होती. वृद्धापकाळात एकाकी रहाणे म्हणजे काय याचा अनुभव पुष्कळाना आहेच. विहिरीचे पाणी काढणे, जेवण करणे, घराची स्वच्छता ठेवणे, देवाची पूजाअर्चा करणे वगैरे बाबतीत ती अखेरीस परावलंबी झाली. वाताचा त्रास सुरू झाला. अनेक वेळा कोणा शेजाऱ्याची तार यावी आणि आम्ही मुंबईहून गावी जाऊन मुक्काम ठोकावा तेव्हा कोठे आईच्या चेहऱ्यावर हसू दिसे. माझा धाकटा भाऊ सद्‌गुरु हा आईच्या सेवेत नेहमी तत्पर असे. पण पुष्कळदा सरकारी नोकरी आणि कर्तव्ये आड येत. त्यामुळे दर शनिवारी रविवारी तांबोशास जाणे त्याला जमत नसे. पुढे आम्ही तिला सावंतवाडीस आणून ठेवली. आईचा जीव नेहमी तांबोशास टांगलेला असे, तांबोशाचे घर बंद राहू नये, देवाची पूजाअर्चा वेळेवर व्हावी, ही तिची इच्छा सहा तपांहून अधिक काळ तिने ते घर राखले. गोव्याच्या सत्याग्रहाच्या काळात हे घर मोडून पडले होते. पुढे आईने वर्षभर खपून स्वतःच्या श्रमाने मातीच्या भिंती घालून तिने ते उभे केले. आई-वडिलानी आपल्या हाताने बांधलेली वास्तू मोडू नये म्हणून तिने फार कष्ट केले. सेवानिवृत्तीनंतर आपला भाऊ येथे येईल अशी तिला उमेद होती. परंतु तसे झाले नाही. तो कायमचा वसईस राहिला. आणि आईच्या मृत्यूनंतर (१८ मार्च १९७९ रात्री ११ वा.) ते घर बंद राहिले. जेव्हा केव्हा आम्ही तेथे थोड्या वेळासाठी जातो तेव्हा दरवाजावर आईची वाट पहात बसलेला तिचा कुत्रा आम्हाला आढळतो. तो तिची सारखी वाट पाहात असतो. आमच्या सभोवती तो उड्या मारतो, भुंकतो आणि वारा प्याल्यासारखा घरात घुसतो. त्याच्या पुढ्यात आम्ही लाडू, पाव खाण्यासाठी टाकतो. पुढ्यात पाण्याने भरलेले भांडे ठेवतो. तो मूका प्राणी डोळ्यातून अश्रूंचा लोट गाळत उभा रहातो. मुका जीव प्रेमाचा भुकेलेला आहे.

आईच्या मृत्यूनंतर तांबोशाचे घर तिच्या इच्छेप्रमाणे मी दुरुस्त करून घेतले. तिची शेवटची इच्छा मी पुरी केली.

दारासमोरच्या तुळशीमध्ये असलेले तुळशीचे झाड आता सुकून गेले आहे.

जास्वंदीची फुलझाडे आता कोमेजून गेली आहेत. नेहमी स्वच्छ असणारी पायवाट आता पानांच्या पताऱ्याने भरून गेली आहे. काजू, आंबे, फणस, नारळीची झाडे ही आता चोरांचे धन झाले आहे. अंगणातील तुळशीसमोर तेवत राहणारे निरंजन आता तेथे दिसत नाही. माझी आई ही प्रकाशाची अग्रदूत होती. विश्वात जो प्रकाश भरून राहिलेला आहे त्यात तिचे अस्तित्व मला नेहमीच जाणवते. आई अमर आहे... चिरंजीव आहे. तिच्या कृपेची सावली आमच्या जीवनावर अढळ राहिलेली आहे ! आई हेच ईश्वराचे रूप आहे ! !

मी तिला पुन्हा पुन्हा वंदन करतो !

जून १९८४.

– **गुं. फ. आजगांवकर**

। मातृदेवो भव ।

अगदी पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई आपणाजवळ आहे. श्रुति म्हणते, ' मातृदेवो भव ' जन्मतःच मुलाला आईशिवाय कोण दिसते ? वत्सलतेच्या रूपाने ती परमेश्वराचीच मूर्ती तेथे उभी असते. ह्या मातेचीच व्याप्ती आपण वाढवू व ' वंदे मातरम् ' म्हणून राष्ट्रमातेची व पुढे सर्व भूमातेची, पृथ्वीची पूजा करू. परंतु आरंभी उंचात उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई निमित्तमात्र आहे. परमेश्वर तिच्या ठिकाणी आपली वत्सलता ठेवून तिला नाचवितो. तिला बिचारीला कळत नाही की का एवढी आतून माया वाटते. म्हातारपणी आपल्या उपयोगी पडेल या हिशेबाने का ती त्याची सेवा करीत असते ? छे... छे... तिने त्या मुलाला जन्म दिला. तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला मुलाचे वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती माऊली म्हणजे वत्सलतेची मूर्ती.

–विनोबा भावे

नित्य पूजेची तयारी करताना आई खालील स्तवने म्हणत असे–

श्री गणपती

उठा उठा हो सकळीक । वाचे स्मरावा गजमुख
ऋद्धिसिध्दीचा नायक । सुखदायक भक्तांसी
अंगी शेंदुराची उटी । माथा शोभतसे किरिटी
केशर कस्तुरी लल्लाटी । हार कंठी साजिरा ॥ १ ॥

कानी कुंडलांची प्रभा । चंद्र सूर्य जैसे नभा
माजी नागनंद शोभा । स्मरता उभा जवळी तो ॥ २ ॥

कासे पीतांबराची धटी । हाती मोदकांची वाटी
रामानंद स्मरता कंठी । तो संकटी पावतो । ३ ॥

श्रीराम

उठोनिया प्रातःकाळी । जपा रामनामावळी
स्वये ध्याती चंद्रमौळी । शैलबाळी समवेत ॥धृ॥

राम योग्यांचे मंडण । राम भक्तांचे भूषण
राम धर्माचे रक्षण । संरक्षण दासांचे ॥१॥

रामे ताटका मारिली । रामे शिळा उद्धारिली ।
रामे जानकी पर्णिली । गणिका केली ते मुक्त ॥२॥

रामे पाषाण तारीले । रामे दैत्य संहारिले ।
रामे बंदी सोडविले । मुक्त केले सुखद ॥ ३ ॥

रामे रक्षिले भक्तांसी । रामे सोडविले देवांसी ।
रामदासाचे मानसी । रामदासी आनंद ॥४॥

उद्योगमूर्ती आई

आईच्या आठवणीचा इतिहास म्हणजे उद्योगाचा इतिहास ! सकाळ-पासून रात्री झोपेपर्यंत ती उद्योगात असे. उद्योगाशिवाय बसणे तिला केव्हाच शक्य झालेले पाहिले नाही. दिवसा ती पाच मिनिटे झोपली असे केव्हाच घडले नाही. घरातील कुटुंबियाना भोजन घालण्यापूर्वी चुलीतील अग्निनारायण, इतर देवदेवताना नैवेद्य दाखविणे, कावळ्या कुत्र्याना, भिकाऱ्याला अन्नदान करणे वगैरे कार्यक्रम होत. कुटुंबातील सर्वजण जेवल्यानंतर व भिकाऱ्याचे पान वाढून ठेवल्यानंतर शेवटी आपण जेवत असे. दुपारी काय अन् रात्री काय एका जादा माणसाचे जेवण तिचे नेहमी तयार असे. तांबोशाला जेवण तिचे नेहमी तयार असे. तांबोशाला (गोव्यात) केव्हाही कोणाचे आगमन झाले तर ' कपडे काढ– पाय धू आणि जेवूक बस.' असे ती म्हणे व आलेल्याला जेवायला वाढी. जाणाऱ्या माणसाला कधीही रिक्त हस्ताने पाठवीत नसे. गरीब–श्रीमंत असे वर्गभेद तिच्याकडे नव्हते. सोवळे ओवळे असले तरी कोणत्याही धर्मियांच्या पोटात अन्न जाण्यासाठी तिचे हात सदैव पुढे असत.

गावातील (महारवाड्यातील काय किंवा अन्य जातीतील काय) भूक पेटलेली माणसे ' आत्याकडे (त्या गावातील लोक तिला ' आत्या ' म्हणत) जाऊन काय तरी मागूक होयां.' असे म्हणत व घरी येत फणस-गऱ्यांच्या दिवसात गरे, आंब्याच्या दिवसात रायवळ आंबे पेजेचा निवळ, अगर देवतेसाठी वाढलेल्या नैवेद्याचे पान, तर केव्हा खोबरे देऊन आई त्याना पाठवीत असे. एखादा काम करू शकणारा बाबलूसारखा मनुष्य मिळाला तर त्याला प्रथम जेवण घालत असे व नंतर ' ही पारय घे आणि बाजूची वय कर ' असे सांगत असे. वयीचे काम लवकर झाले तर जवळच्या माडाना अळी काढण्याचे काम सांगे. बाबलूही निमूटपणे काम करी.

दाडाच्या देवळाकडील ' थोटला ' (पायाने नीट चालता येत नसलेली बाई) आली तर तिला बेडे सोलण्याचे किंवा भिरडे फोडण्याचे बैठकीचे काम सांगे व पेज अगर भात जेवावयास वाढे. शेजारची सत्यभामा भावीण आली तर खळचात वाडवण मारत असे व इतर किरकोळ कामे करत असे. गावात कुणाची बेंबी सरकली तर ती नीट करण्याचे काम ही सत्यभामा करत असे. आईला एक दोनदा निर्मोळी (डायरिया) झाली असताना सत्यभामेनेच औषध आणून दिले होते. सत्यभामेचे आईला दिवसातून एकदातरी दर्शन व्हावयास हवे होते. कधीकधी मी परगावाहून तांबोसे येथे दुपारी आलो की आई कपडे काढून पेज घेण्याबद्दल प्रथम सांगे व नंतर ' आता सूक्षमपणे बस. सत्यभाम्याकडून कपाळावर त्याल घालून घे. दोनय कानशिलांच्या बाजूक सारख्या घासून घे.' असे सांगून नंतर सत्यभामेस हाक मारी. मी ज्यावेळी ३०–३५ वर्षांचा त्यावेळी सत्यभामा ६५–७० वर्षांची. बऱ्याच वेळा आईच माझ्या डोकीवर तेल घालत असे. मात्र एक गोष्ट खरी की सत्यभामा डोक्यावर तेल घासू लागली की अर्धा अर्धा तास दोन्ही कानशिलांच्या बाजूला तेल घासायची. कानातून व डोळचातून अती प्रखर उष्णता निघून जात आहे असे वाटे व फार बरे वाटे. तेल घालून घ्यावे तर सत्यभामेकडून असे वाटे. त्या दृष्टीने आईची निवड योग्य होती.

गावातील अनेक माणसाना व कुटुंबाना ' आत्या ' हा एक आधार होता. वेखंड, तुरटी, हळद यांचे मिश्रण करून तिने ते तेलात उकळून ठेवलेले असे– गावात कुणी पाय ठेचाळलेला असला किंवा अन्य दुखापत झालेला मनुष्य असला तर आत्याकडे हमखास यावयाचा व ' आत्या, तुझ्याकडे तेलातलां औषध आसां तां थोडां दी गो ' असे म्हणावयाचा. आईही त्याला औषध द्यावयाची. इतकेच नाही तर गावातील महारपोर खळचातून लंगडत जाताना आढळला अगर डोक्याला कुठे त्याच्या मार दिसला तर आई त्याला थांबवत असे. चौकशी करत असे व आपल्याकडचे औषध त्याला देत असे. संबंधित माणसेही दोन चार दिवसानी घरी येऊन ' आत्या, तुझ्या औषधान बरा वाटलां गो ' म्हणून औषधाच्या

गुणकारिकतेची पावती देत. गावातील लहानापासून थोरापर्यंत सर्व माणसे ' गो ऽऽ आत्या ' अशीच हाक मारीत.

आईच्या मृत्युपूर्वीची १५ वर्षे आर्थिकदृष्टया उत्तम गेली. याचे प्रमुख कारण माझा थोरला भाऊ गुंडू होय. दरमहा १०० रुपयांची मनिऑर्डर तो नियमित पाठवीत असे. ज्या ज्या वेळी तो गावी येई त्या त्या वेळी मीठमसाल्यापासून तो तांदळांपर्यंत पुरवठा करून जात असे. त्यापूर्वीसुद्धा आईचे घर केव्हाच पुसलेले नसे. प्रत्येक वस्तू गरीबीतही थोडी ना थोडी असे. ' आर्थिक नियोजन ' हा जाडजूड शब्द तिला माहीत नसला तरी शिलकीला काही ना काही ठेवून ती खर्च करत असे. घरात शेरभर तांदूळ असले तर चार दिवस पाव शेर पाव शेर तांदूळ खर्चून ती पेज करीत असे व घरचा आव राखत असे. घरात काय आहे व काय नाही हे तिने बाहेरच्याला कधीच कळू दिले नाही व असेही दिवस काढले. आम्हा मुलाना लुसलुशीत टायकळयाची भाजी, पेव्याची भाजी (एका वनस्पतीची पाने) रानातील भारंगीची भाजी, शेगलाची भाजी, आळू, कणयचे कोंब, फणसाच्या दिवसात खतखतले अगर गऱ्यांची भाजी, सुरणाच्या पाल्याची भाजी, वगैरे पूरक आहार व पेज घालून भाताची उणीव भासू देत नसे. आम्हा मुलांचे लहानपणी पोट भरत असे.

आईला अक्षरओळख होती. लहानपणी पेन्सिल कशी धरावी त्यासाठी मध्यमा, तर्जनी व आंगठा यांची ठेवण कशी असावी याचे प्रात्यक्षिक सातत्याने तिने सुरू ठेवले होते. तिने तशी सवय मला लावली नसती तर आंगठा व तर्जनीचाच उपयोग करून लिहिण्याचा सराव झाला असता व तो मोडणे कठीण झाले असते. आम्हा दोन्ही मुलाना मूळाक्षरांचा परिचय करून देण्यात आईचा भाग मोठा होता.

माझ्या माहितीप्रमाणे आम्ही ३०–३१ सालापासून (गोव्यातील) तांबोसे येथे सावडर्याहून राहावयास आलो. १९३०–३१ चा काळ म्हणजे मंदीचा काळ. तांबोसे येथील थोडी शेती, माडांची झाडे व किरकोळ पोफळीची बागायती. एवढेच उत्पन्न. तांबोसे हे आमचे आजोळचे गाव. शिवराम बाळकृष्ण सामंत हे आमचे आजोळचे आजोबा.

माडीचे घर असले तरी ओबडधोबड मातीच्या भिंती उभ्या करून बांधलेले. प्रवेश दरवाज्यावरील मातीला आलेला ओटा, डावीकडे देव-खोली, समोर माडीच्या चौकाखालील वाणशी, देवखोलीसमोर लागून स्वयंपाक घर. उजवीकडे वाणशीला लागून पूर्व-पश्चिम दोन खोल्या. पश्चिमेकडची खोली म्हणजे आपल्या मुलींच्या बाळंतपणासाठी आजोबानी बांधलेली व राखून ठेवलेली खोली होती. घराच्या उत्तरेकडील भागात घर. बागायतीचा बराच भाग व वायंगणी शेताची जमीन, पलीकडे ब्राह्मणींचे देऊळ व त्या देवळाच्या मागे गावची स्मशानभूमी. अशा प्रकारच्या उत्तरेकडील भागात एकही घर नव्हते. आजही नाही. नैऋत्येला भेऱ्या तात्यांचे घर, दक्षिणेकडे पन्नास यार्डावर सत्यभामा भावणींचे घर व आग्नेयेच्या कोपऱ्यावर लखूभाऊचे घर हाच आमचा शेजार होता.

गावात विठ्ठलमंदिरात एक शाळा होती. गावडे नावाचे एक शिक्षक होते. त्यांचे स्वतःचे शिक्षण ६–७ वी इयत्तापर्यंत झाले होते १ ते ४ इयत्तांची सामुदायिक प्रार्थना सकाळी होई व सायकाळी १ ते १०० चे अंक व औटकी अकरकीपर्यंतचे पाढे सामुदायिकपणे म्हटले जात. एक पाढा एका विद्यार्थ्याने म्हणून पूर्ण झाला की दुसऱ्या मुलाची पाळी येई. इतर मुले त्या मुलाच्या मागाहून म्हणत असत सायंकाळी शाळा सुटताना गावडे मास्तर सर्व इयत्तातील मुलाना एकच अभ्यास घरून करून आणावयास सांगत. तो असा, 'धडा, धडयाचे अर्थ, उजळणी व पाटीवर पाच ओळी शुद्धलेखन.' गावडे मास्तरांची मुलाना जरब मोठी होती. आवाजही खणखणीत होता. हे गावडे पाडलोस गावचे होते. त्यांचे नाव भिमा फटू गावडे असे होते. मी प्रमुख शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून सावंतवाडीस बदली होऊन येण्याच्या दरम्यान वीज पडून त्याना मृत्यू आल्याचे नंतर समजले. मी बिगरीत असल्याने व गुंडू दुसरीत असल्याने तसेच आज ना उद्या मुलांच्या शिक्षणासाठी बाहेर गावी जावे लागणार या दृष्टीने तांबोशाची शाळा आईला उपयोगी पडणारी नव्हती.

•

आमचे शिक्षण

मुले शिकली पाहिजेत, पुढे यायला हवीत असा आईला ध्यासच होता. तिने बांदे येथे बिऱ्हाड करावयाचे ठरविले. माझे वडील फायनल-पर्यंत (त्यावेळच्या मराठी ६ इयत्ता) शिकलेले. त्यांचे हस्ताक्षर मात्र मोत्यांसारखे होते. मुंबईला त्याना व्यापारी कारकुनीचा अनुभव होता. दुकानदार कारकून म्हणजे ६–७ रुपये पगार. असे असले तरी बांदे येथे बिऱ्हाड करण्याचे आईने ठरविले. वडिलानाही (आप्पाना) तो निर्णय योग्य वाटला. बांदे येथील नाना स्वारांच्या शेजारी व आबा बोके यांच्या घरी एका चिचोळया अडगळीच्या काळोख्या जागेत त्यानी बिऱ्हाड मिळविले. या जागेची उंदीर घुशींनी केलेली बिळे भरून काढण्यात आईचे पहिले चार पाच दिवस गेले. बांद्यात त्या काळात आपल्या वैशिष्टयपूर्ण वागणुकीमुळे दोन व्यक्ती सर्व लोकांच्या तोंडात वाक्प्रचार म्हणून वापरल्या जात. एक म्हणजे 'आबा बोके' व दुसरी व्यक्ती म्हणजे 'निळू वाळके.' या दोन व्यक्तींचा वेळोवेळी उल्लेख होई.

अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल, बांदा या शाळेत माझे बिगरीत व गुंडूचे तिसरीत नाव दाखल करण्यात आले. आपल्या मुलांप्रमाणे शेजारच्या गोकळा आकाची मुलेही शिकावीत असे आईला वाटे. म्हणून दुसऱ्या वर्षी घरच्या आढयाच्या बाजूस राहून आई गोकळाआक्कास म्हणाली, 'गो गोकळचा ऽऽऽ तुझ्या रामकृष्णाक् व दत्तूक माझ्याबरोबर बांद्याक् धाड शिकाक. गुंडू सद्गुरूबरोबर ते शिकतील आणि असां तू केलंय नाय तर ते राखणे होतले गोऽऽऽ' आपली गरीबांची परिस्थिती असताना व आपल्याच दोन मुलांच्या शिक्षणाची समस्या सोडविण्यात अडचणी असताना आईने शेजारच्या आणखी दोन मुलांची जबाबदारी स्वतःवर ओढवून घेतली होती. मर्यादित जागेत आम्ही चार माणसे व शेजारची

दोन मुले मिळून सहाजण बोवयांच्याच घरात राहू लागलो. रोज दुपारी व सायंकाळी आम्हास संध्येची संथा देण्यासाठी आईने रामकृष्णाचा उपयोग करून घेतला. घरातील इतर कामासाठीही रामकृष्णाचा उपयोग होत असे. बांदेश्वराच्या देवळात जाऊन कोणी ना कोणी तीर्थ आणल्याशिवाय आमच्यापैकी कुणालाही अन्न मिळत नसे. रामकृष्ण सातवीपर्यंत बांदे येथे होता. त्याचे पुढील शिक्षण झाले नाही. दत्ताराम पुढे सावंतवाडीस हायस्कूलचे शिक्षण घेण्यासाठी येऊन नंतर लष्करात दाखल झाला. १९४१ पर्यंत म्हणजे १० वर्षे आमची बांद्यात चार बिऱ्हाडे झाली. पैकी पहिले आबा बोक्यांचे घर, दुसरे शांताराम नाडकर्णी यांच्या शेजारी पावसकर यांचे घर, तिसरे बिऱ्हाड म्हणजे गोशाळेजवळील पाटकरांचे घर व चौथे बिऱ्हाड म्हणजे शेवडे यांचे त्याच वाड्यातील घर.

बांदे येथे बिऱ्हाड असले तरी दर शनिवारी रविवारी आई आम्हाला घेऊन तांबोसे येथे जात असे. बांद्याहून तांबोसे येथे लंगार बागातील कडशी नदीचा एक फाटा (त्या फाट्याला ' पोय ' असे नाव होते.) ओलांडून जावे लागत असे. हे अंतर ४ मैलांचे होते. गोव्यावर पोर्तुगीज सत्ता असल्याने पत्रा देवीचा पुढील प्रदेश गोव्यात म्हणजे पोर्तुगीज हद्दीत व पत्रा देवीच्या अलीकडील भाग इंग्रजी राज्यात (त्या वेळच्या सावंतवाडी संस्थानात) मानला जाई. मिरच्यांच्या हंगामात वांगी, मुळा, मिरची वगैरे पीक नदी शेजारील मळी विभागात घेतले जाई.केव्हा केव्हा ती जमीन रामकृष्णाकडून नांगरून घेत असे. नदीचे पाणी रामकृष्ण लाठीने काढी व छोट्या वहाळीतून आलेले पाणी कल्यांने आई रोपांवर शिंपी. आम्ही दोघंही त्या पाण्यात हाताचा पसा करून थोडे थोडे पाणी मिरचीच्या रोपावर शिंपडू व मधूनमधून एकमेकांच्या अंगावरही शिंपडीत असू. ' मेल्यानो, मी काम करूक बघतंय तर तुम्ही थंडीने शीक पडाक बघतात. माका घोपाण नाय तुमचा शीकपणा काढूक !' असे आई म्हणे व माझ्या पाठीवर जरा मोठ्याने धपाटा मारून गुंडूवर त्या मानाने कमी आवाजाची व कमी जोराची चापट मारी. हा फरक करण्याचे कारण अगदी लहानपणात गुंडू एक दोन जिवावरच्या आजारातून उठला होता व तेथून तो अशक्त

राहिला होता. फटक्यांचे काम आले कीं जोराचा फटक्याचा प्रसाद मला हमखास असायचा. गुंडूच्या पूर्वीची दोन भावंडे गेलेली असल्याने गुंडूला आईकडून ब आप्पांकडून (वडील) थोडा सहानुभूतीचा मार मिळत असे.

मारामुळे आम्ही दोघेही थोडे कोडगे बनलो होतो. किरकोळ माराची आठवण पुसट झाली असली तरी दुसऱ्या मुलाना आईवरून शिवी घातल्यामुळे व एक मुलावर दगड मारून त्याच्या कपाळाला खोक पडल्याने आईने माझ्या पोटावर बसून व मुठीने कांदा (चेचून) माझ्या डोळ्यात घातला. ही शिक्षा पहावयास शेजारची मोठी माणसे व लहान मुलेही प्रेक्षक म्हणून आली होती. दुसऱ्या प्रसंगी खांबाला बांधून व माझ्या अंगावर गुळाचे पाणी शिंपडून चावणाऱ्या मुंग्या ('हुमले') सोडल्या होत्या. आप्पाना सदरची शिक्षा पसंत नव्हती. म्हणून शाब्दिक निषेध करून आईला त्यानी बाजूला केले व शेजारच्या माणसानी मला नाना स्वारांनी बांधलेले दोर लगेच सोडविले.

अशा प्रसंगी त्या वयात मला आईचा राग येई व मी आठ मैलावर सावंतवाडीस असलेल्या मावशीच्या घरी नदी ओलांडून शेर्लेमार्गे पायी गुपचूप जात असे. अशा वेळी आई माझ्यापूर्वी जेवणार नाही व माझी शोधाशोध करण्यात तिला त्रास होणार याची मला जाणीव असे. मला मारलेल्याचा परिणाम तिला त्रास होण्यात होणार याची मला खात्री होती. तो तसा झाला की माझ्या यातना कमी होत असत. संध्याकाळपर्यंत आप्पा सावंतवाडीस येत व लगेच बांद्यास परतून मी खुशाल असल्याचे आईस सांगत. नंतर मग आई भोजनास बसत असे. सर्वांत शेवटी जेवणासाठी बसणारी आमची आई असे. पुढे लग्न होऊन सुना आल्या आम्हास मुले झाली, तरी सर्वात शेवटी जेवण्याचा आपला हा क्रम तिने सोडला नव्हता.

मराठी शाळा आमच्या बिऱ्हाडाच्या अगदी शेजारी असल्याने मला मिळणाऱ्या कडक शिक्षेची माहिती मुलांमार्फत शाळेतील शिक्षक वर्गाला माहीत झाल्याने शिक्षकांकडून आम्हाला केव्हाच मार मिळत नसे. त्यांच्याकडून सहानुभूतीने पाहिले जाई. त्या काळात झाडून सारे शिक्षक

मारके होते. खतीब मास्तर बिगरीवर असात त्यांच्या हातात रूळ असे. आगा मास्तर चौथीवर व ते मुलांच्या पाठीवर हाताचा मुटका करून मारत असत. जॉन हेडमास्तरांच्या हातात वेताची काठी असे. त्या काठीला बघून काही मुले चूळचूळ मुतत असत. शांताराम नाडकर्णी आपल्या हातात जाडजूड फूटपट्टी वापरत असत. ते इंग्रजी १ ते ३ इयत्ता शिकवीत. इ. ५ वी तील विद्यार्थी त्यांच्याकडे १ ली इंग्रजीसाठी, इ. ६ वी तील विद्यार्थी २ री इंग्रजीसाठी व इ. ७ वी तील (फायनल) विद्यार्थी इंग्रजी तिसरीसाठी त्यांच्याकडे येत. या सर्व मारक्या शिक्षकांनी आम्हा दोघा बंधूना केव्हाच मारल्याचे आठवत नाही. तसाच प्रकार घडला तर ' आईला सांगू काय ?' असा प्रश्न संबंधित शिक्षक विचारीत. केव्हा केव्हा आमचे दुपारचे जेवण अडीच तीनच्या पूर्वी होत नसे आणि अशा वेळी आम्हाला तर घंटेपूर्वी शाळेत जावे लागत असे. तीन साडे तीन वाजता शाळा सुरू असतानाच शिक्षकाना सांगून जेवण्यासाठी घरी जाण्यास आम्हाला मुभा होती. शाळेचे शिक्षक बुद्धीचा स्वतंत्रपणे कसा उपयोग करत असत ते दाखविणारा एक प्रसंग सांगितला पाहिजे.

माझा थोरला भाऊ गुंडू तीर्थ आणण्यासाठी नेहमीप्रमाणे बांदेश्वराच्या देवळात गेला होता. दोन वाजेपर्यंत तो न आल्यामुळे आम्ही सर्व घाबरून गेलो. नाना स्वारांची सर्व मुले (शांताराम, आबा, रामकृष्ण) सायकलवरून बांदे विभागात सर्वत्र गुंडूचा शोध घेण्याकरिता फिरू लागले. अडीच वाजता जॉन मास्तर आमच्या घरासमोरून नित्याप्रमाणे शाळेत जात होते. घरातून बाहेर येऊन आईने जॉन मास्तराना सर्व हकीकत सांगितली जॉन मास्तरनी शाळेत जाऊन सर्व मुलांना पटांगणात उभे करून ' गुंडू कुठे दिसला होता काय ?' अशी इ. ५ ते ७ मधील मुलांकडे चौकशी केली. तसेच अर्ध्या तासाच्या आत त्याचा शोध लावण्यासाठी वरच्या इयत्तातील मुले सोडली. काही मुले आळीत, काही निमजग्यावर, काही नदीकडे. काही गोलघुमटाच्या दिशेने, काही चिरेखणाकडे, काही पत्रादेवीच्या दिशेने गेली. आईने माझ्याकडे बांदेश्वरासाठी नारळ दिला (शिवलिंग आहे) व देवासमोर ठेवण्यासाठी सूचना दिली. हा नारळ घेऊन मी बांदेश्वराच्या देवळाकडे (शाळेच्या

पाठीमागून) जात असताना झिलू गणेश बांदेकरच्या घराच्या आसपास गुंडू येताना फलींग अंतरावरून मला दिसला. तो पायाळू असल्याची माहिती मिळाल्यामुळे दत्तू वाटवे भटजीनी त्याला अंजन लावले होते. मुदतीत त्याला अंजन उतरता आले नाही. त्यामुळे गुंडूस घरी येण्याचे भान राहिले नाही. मी गुंडूस घरी आणून पोहोचविले व देवास नारळ ठेवण्यासाठी देवळात गेलो.

•

जागृत दिवस

त्या काळचे बांद्याचे दिवस चैतन्यपूर्ण होते यात संशय नाही. पहाटे ४ वाजता ताता पाटकर (का. ल. पाटकर) हे प्रभातफेरी काढत त्यांच्याबरोबर आम्ही ३०–४० मुले असू. 'चरखा चला चलाके–लेंगे. स्वराज्य लेंगे' यांसारखी समूहगीते ते म्हणत व त्यांच्या मागाहून आम्ही म्हणत असू. सकाळी साडेपाचसहापर्यंत फेरी संपे. विठ्ठलमंदिराकडे त्या फेरीचे विसर्जन होई विसर्जन होता होता ताता आम्हा सर्वांना पेपरमिंटच्या गोळ्या देत. त्यामुळे प्रभातफेरीतील मुलांची संख्या विठ्ठल मंदिराकडे वाढत असे. भाम्याच्या (कामत) दुकानापासून आळीत जावयास जी जवळची पायवाट होती त्या पायवाटेला लागूनच घाब्रूचे घर होते. मुद्रास नावाचे शिक्षक त्या ठिकाणी उभे राहून दारूबंदीच्या संदर्भात पिकेटिंग करत असत. विठ्ठल मंदिरात अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांची व्याख्याने होत असत. मराठी शाळेची वार्षिक स्नेह संघ समेलन होत असत.

सावंतवाडी संस्थानात त्यावेळी बापूसाहेब महाराज राज्य करीत होते. त्यांच्याबद्दल सर्व प्रजाजनात अतिशय आदराचे स्थान होते. १९३७ च्या दरम्यान ते पुणे येथे अपघाती निधनाने आम्हास सोडून गेल्याचे समजले. त्यावेळी सर्व दुकाने बंद झाली. त्या दिवशी आम्ही सर्वजण घरात काहीही न खाता उपाशी राहिलो.

आमचे आप्पा नोकरीवर एका ठिकाणी फार काळ टिकत नसत. खाजगी नोकरीत अपमानाचे प्रसंग वारंवार येतात. त्याना ते सहन

होत नसे. चारपाच महिने नोकरी करून ती सोडल्यावर दुसरी नोकरी मिळेपर्यंत ३-४ महिने जात. या काळात आम्हा मुलांच्या पोषणाची जबाबदारी आईवर पडे. ती उणीव भरून काढण्यासाठी तांबोसे येथील पडित जमिनीत तिने मशागत करून अनेक प्रकारची पिके काढून त्या जमिनीस बोलते केले व शेतातील पिके हासू लागली. कुळीथ, तूर, उसाच्या दिवसात उशील लावून घेणे. तांबडे कांदे व इतर छोटी छोटी पिके कुणाकडून ना कुणाकडून अर्धलीने ती घेत असे. शाळेच्या वेळात केव्हाकेव्हा तिला एकटीला बांदे येथून जावे लागे. केव्हा भाऊना (आजोबाना) तर केव्हा आप्पाना तो घेऊन जात असे. सकाळी जाऊन संध्याकाळी येणे असेही मधून मधून घडत असे. येताना नारळ फणस किंवा इतर नाचणी वगैरे कोणते ना कोणते धान्य ती कमरेवर घेत असे व सोबत आम्ही असलो की आमच्या डोकीवर देत असे. विशेषतः सोबत मी असलो तर ' वजा घेव्क सद्गुरू आसा. आता बिशात कसली ?' असे म्हणून ' अरे ह्या केल्याशिवाय खाव्क मेळणानाय झिला ' अशीही पुस्ती जोडत असे.

तांबोसे बांदे पायरस्त्यावर (पत्रादेवी वाटेवरून) पोर्तुगीज ठाणे लागे. पोर्तुगीज हद्दीत पोर्तुगीज ठाणे व बांदा हद्दीत इंग्रजांची कस्टम कचेरी असे. एका व्यक्तीला तीन नारळापेक्षा जास्त नारळ सुटत नसत. असलेले सर्व सामान तेथील शिपायाना दाखवावे लागे. त्यानंतर सुटका होई. या यातायातीतून सुटका करून घेण्यासाठी त्या वाटेने येणाऱ्या-प्रत्येक प्रवाशाकडे तीन तीन नारळ द्यावे लागत व दोन्ही कस्टम ठाणी पार पाडल्यानंतर 'सौदागरच्या दुकानात (गुण्यांच्या दुकानात) ठेवून चला ' असे आई सांगे. ओळखीची माणसे ही जबाबदारी घेत. अशी माणसे मिळेपर्यंत पत्रादेवीच्या पलिकडे देवीचे नाव घेऊन प्रवासी मिळे-पर्यंत ओझे जमिनीवर ठेवून वाट पाहावी लागे. या जकात नाक्याच्या दुःखामुळे डोकीवरचे ओझे क्षुल्लक वाटत असे. स्वाभिमानाने, कष्टाने जगणाऱ्या आईला शासनाचा हा त्रास शासनासारखाच वाटे. पण उपाय नव्हता गुलामगिरीचा तो काळ होता.

आईला कोणतेच काम नसले तर ती बांदेश्वराच्या मंदिरात जाऊन प्रदक्षिणा घालत असे. आपले दुःख ती देवाला सांगे. ' आपला दुःख

सांगूचा देवाक्, नायतर आवशीच्या घोवाक ' असे ती केव्हा केव्हा म्हणे. अर्थात तिचे बाबा (भाऊ) केव्हा केव्हा गंगाकडे (सावंतवाडीची मावशी) अगर मांडकुलीस अगर अन्यत्र जाऊन मधून मधून रहात असल्याने देवालाच ती दुःख सांगण्याची संधी घेई. तिचे आराध्य दैवत म्हणजे दत्त महाराज. नरसिंहवाडीवर तिचे फार प्रेम होते. शनिवार, गुरुवार आणि उपोषणाच्या एखाद्या दिवशी नैवेद्य दाखविताना दत्त महाराजांचे नैवेद्याचे पान ठरलेले असे. आईच्या आईचे नाव गजाबाई. तिला गजाआक्का म्हणत असत. तिला तीन मुली झाल्या. पैकी थोरली म्हणजे माझी आई शांता होय. दुसरी कमळा (मळगावला दिली होती) तिसरी गंगा (हिला तेंडोलीला दिली होती.) मुलगा नाही म्हणून गजा आक्काने नरसिंहवाडीच्या दत्ताला नवस केला. ' माका झील झालो तर मी चालत तुझ्या दर्शनांक् येयन ' असे सांगणें केले. त्याप्रमाणे तिला मुलगा झाला व त्याचे नाव रामचंद्र असे ठेवले. गजा आक्काने चालत नरसिंहवाडीला जाऊन नवस पूर्ण केला. आपल्या आईला जो देव पावला त्यालाच वाहून घेणे योग्य असा माझ्या आईचा निर्धार लहानपणापासून होता असे म्हणायला काहीच हरकत नाही. बांदे येथील वास्तव्यात दीड वर्षाचा छोटा भाऊ मोहन कावीळ होऊन वारला व १९४० च्या दरम्यान भाऊ (आजोबा) स्वर्गवासी झाले. त्यावेळी आईने एकेक महिना धड ना अन्न ना पाणी अशा अवस्थेत अडगळीच्या काळोख्या कोपऱ्यात दिवस रडून काढले. देवाला उद्देशून ' मेल्या, तू देव कसलो ? तू आसय खंय ? आसतंय तर तू इलंय असतस ! तू केवाच मेलय तर येतलस कसो ! ' असे ती टाहो फोडून विचारत असे. केव्हा आपले डोके देवाच्या भिंतीवर आपटून घेत असे. इतके झाले तरी देवावरील तिचा विश्वास कमी झाला नव्हता.

वटपौर्णिमेचा उपवास म्हणजे आपल्या नवऱ्यासाठीच असतो. आईचा तीन दिवसांचा वटपौर्णिमेचा खडतर उपवास असे. विहिरीवर थंड-पाण्याने पावसाच्या दिवसात ती स्नान करत असे. चुलीवरचा कोणताही पदार्थ (चहासुद्धा) ती घेत नसे. १९६२ मध्ये आप्पा वारले. माझी कल्पना अशी होती की त्यानंतर आईचे हे उपोषण थांबेल. कारण आप्पांच्या एका आजारात तीन दिवसांच्या उपोषणाचे सांगणे तिने

केले होते. आप्पाना उतार पडला होता. त्या वर्षापासून गेली कित्येक वर्षे सुरू असलेला हा उपवास आईने आप्पांच्या मृत्युनंतरही सुरू ठेवला होता. देवावरची तिची निष्ठा कमी केव्हाच झाली नाही. राग आला अगर अन्य आकांताच्या वेळी ती देवाला शिव्यासुद्धा घालत असे ही गोष्ट खरी. आषाढी एकादशी दिवशी रात्री ती जागरण करीत असे. कीर्तन, प्रवचन असले की बांदेश्वर मंदिरात अगर विठ्ठल मंदिरात आईबरोबर आम्ही जात असू. गाडगे महाराज, मसूरकर, पटवर्धन यांची कीर्तने ऐकण्याची संधी आईमुळे मिळाली. दिवेकर शास्त्री यांची बुवाबाजीवर झोड उठविणारी प्रवचने आम्ही बांद्याच्या विठ्ठल मंदिरात ऐकली. विठ्ठल मंदिरात सप्ताहाच्या दिवसात तेथे केव्हाही जाण्यास आम्हास मुभा असे.

दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी जे किरकोळ पैसे लागत ते मिळविण्यासाठी दर सोमवारच्या बाजारात नारळ, सुपारी, फणस नेऊन विकावे लागत असत. गुंडू शाळेत प्रत्येक वर्षी पहिल्या नंबरने पास होत असल्याने त्याचा शाळेचा दिवस खाडा होणे आईला पसंत नसे. शिवाय उन्हात त्याला उभे करणे शारीरिक दुर्बल प्रकृतीमुळे योग्यही नसे. अर्थात हे काम मलाच पार पाडावे लागे. आरंभी आरंभी मला फार लाज वाटत असे. त्यावेळी आई म्हणे, 'लाज आणि भीड भिकेची भैण, पोटाक होया तर काम करूक होया चोरी न्हय ही झिला ! माल खपला नाही व दुपार झाली तर आई गुंडूला पाठवीत असे व मी जेवायास येत असे. सोमवारचा दिवस म्हणजे माझा व्यापाराचा दिवस होता.

१९३७ साली गुंडू सावंतवाडीस हायस्कूलमध्ये पुढील शिक्षणास ठी म्हणून गेला व आर्थिक परिस्थितीच्या फटक्यामुळे त्याला शिक्षण सोडावे लागले व तो न्हयची आड येथे ९ रुपये पगारावर प्राथमिक शिक्षक झाला. महिना संपताच त्याला खात्रीने मिळणारे हे नऊ रुपये आम्हाला फार मोठ्या आधाराचे वाटले. दोन रुपये तो भाऊ आजोबाना देत असे. ४ रुपयात तो आपले भागवीत असे व तीन रुपये तो घरी देत असे. त्या काळात तांदूळ गोण ५ रुपयात होती. नंतर गुंडूचा पगार ९–४–१३ रुपये झाला. आईला त्यावेळी ७ रुपये मिळू लागले. आपला

मुलगा सरकारी मास्तर झाला व आपणास सात रुपये मिळतात याचा आईला किती आनंद झाला !

त्या दरम्यान बांदे येथे काही तरुण व शिक्षित लोकानी स्वतंत्र खाजगी शाळा सुरू केली. प्रथम ही शाळा घावरूच्या घरात सुरू झाली. नंतर ती शाळा गोशाळेत (श्री. पाटकरांच्या) गेली. या शाळेचे नाव ‘ मॉडेल इंग्लिश स्कूल ’ असे होते. मोर्ये मुख्याध्यापक झाले व इतर श्री. कामत, आपा स्वार, श्री. पणदुरकर, श्री. मुद्रस असे उत्साही तरुण शिक्षक होते. घरोघर जाऊन मिळतील तितकी मुले मिळवून श्री. मोर्ये यानी काही काळ ही शाळा टिकवून धरली व नंतर खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूल या नवीनच सुरू झालेल्या सरकारी शाळेत मॉडेल स्कूल ही संस्था विलीन झाली. या मॉडेल इंग्लिश स्कूलमधून शाळेसकट माझे आगमन खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये झाले. खेमराज मेमो-रियलमधून मी पाचवीत २ ऱ्या नंबरने पास होऊन १९४१ मध्ये सावंतवाडीस कळसुलकर हायस्कूलमध्ये इंग्रजी ६ वीत (म्हणजे आजच्या १० वीच्या वर्गात) दाखल झालो. त्या वर्षासाठी मी मावशीच्या बिऱ्हाडी (होळीच्या खुंटावर) रहावयास आलो. त्या काळात सावंतवाडी म्हणजे मलेरियाचे माहेरघर होते. त्या काळातील करमणुकीचे ठिकाण म्हणजे सुदर्शन टॉकीज होय. वर्षातून एखादा सिनेमा पहावयास मिळावयाचा व तोही दोन आण्याच्या पीटात.

शनिवारी मी बांदे येथे चालत जात असे व सोमवार अगर मंगळवारी सावंतवाडीस येत असे. मलेरियाचा ताप आला तर शाळा चुकत असे. त्यावर्षी ५६ दिवस मी शाळेत हजर होतो व अशाही परिस्थितीत उत्तीर्ण होऊन १९४२ च्या जूनमध्ये मॅट्रिकच्या वर्गात दाखल झालो. श्रीराम वाचन मंदिराच्याजवळ गणपुलेंच्या शेजारी हवालदाराच्या जागेत आमची एक खोली होती. खोलीचे भाडे दीड रुपया होते.

•

सावंतवाडीचे दिवस

आमचे आप्पा एका पेढीवर होते. आईही सावंतवाडीस आली. बांद्याच्या दोन देवळाएवजी सावंतवाडीची दोन देवळे आईला मिळाली. श्री विठ्ठल मंदिर व आत्मेश्वराचे मंदिर. मधून मधून या दोन्ही देवळात आई जात असे. मला तीन आणे फी होती तीही वर्षभर (मॅट्रिकच्या पूर्वीचे वर्ष) देता आलेली नव्हती. पायात चप्पलही नव्हती. अशा परिस्थितीत सावंतवाडीच्या मलेरियाने आप्पाना अशी मिठी मारली की, चार महिने ती सुटेना. त्या वर्षी गुंडू बेळगावला ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणासाठी गेला. ट्रेनिंग पूर्ण करणार अशी त्याची जिद्द होती. काही लोकांशी संपर्क साधून खर्चासाठी त्याने थोडा थोडा निधी जमविला. श्री. के. एच. केळकर, पु. मं. लाड, गजाननराव रेगे, सुताचे व्यापारी आजगावकर या लोकानी त्याला मदत केली.

गुंडू बेळगावी असल्याने व माझे मॅट्रिकचे वर्ष असल्याने आप्पांचा आजार म्हणजे माझी मोठी पंचाईत झाली. त्या काळात मलेरियावर रामबाण औषध गोव्यात शिवोली येथे मिळणारे होते. दोन रुपयात बाटलीभर काढा मिळत असे. माझ्याकडे फक्त अडीच रुपये होते. सावंतवाडीतील औषधांचा अगर औषधी गोळ्यांचा कहीही उपयोग न झाल्याने मी दोडामार्ग आस्नोडेमार्गे पायी जात असताना 'थिये'ला औषध मिळते असे आस्नोड्याला समजले. तोपर्यंत दिवे लागण झाली होती. तेथील लोकाना विचारत विचारत 'थिये'ला पोहोचलो. ख्रिश्चन वैद्याला भेटलो. त्याच्याच पडवीमध्ये झोपलो. भल्या पहाटे कोलवाळवरून पेडणेमार्गे सावंतवाडीस पायी चालत दुसऱ्या दिवशी पोहोचलो. महत्त्वाची गोष्ट अशी की, या काढ्याचे डोस दोन दिवस पोटात जाताच आप्पांचा मलेरिया कुठल्या कुठे पळून गेला.

आप्पा बरे होतात न होतात एवढ्यात आईने अंथरूण धरले. हा ताप मात्र मलेरियाचा नव्हता. तिला आलेला ताप कमी होत नव्हता.

एक दिवस मी बेळगावला पत्र पाठवून गुंडूस आईच्या आजाराबद्दल कळविले. तो लगेच आला. त्या रात्री आईचा ताप चमत्कारिक अवस्थेत वाढला. आईला पोटातून जळजळू लागले. ती ओरडू लागली. ' माझ्या पोटात चूड पेटल्यासारखी आग होताहा ' असे ती म्हणू लागली. रात्री डॉ. भाऊ परुळकरांच्या घरी गेलो. ते म्हापसे येथे गेल्याचे समजले. डॉ. माने यांचेकडे गेलो. रात्री हाक मारताच ' टॅक्सी घेऊन या ' असे ते म्हणाले. माझ्याकडे औषधालासुद्धा पैसे नव्हते तर टॅक्सीला मी कोठून आणणार ? मी तसाच रात्री दीड वाजता खोलीवर आलो. शेजारच्या गणपुल्यानी सुंठीची थोडी कॉफी दिल्यानंतर तिला जरा बरे वाटून ती झोपी गेली. दुसऱ्या दिवशी आईचा आजार पूर्वीसारखाच झाल्याने धन्वंतरी बंगलोमध्ये जाण्याचे धाडस केले. तेथे पायरीवर एक गोऱ्यापान बाई बसल्या होत्या. मी तेथे गेलो व मला एकदम रड कोसळले. त्या बाईनी मला रडण्याचे कारण विचारताच आईच्या आजाराची मी कल्पना दिली. त्या बाई म्हणजे डॅा. सुवर्ण (एम. एस.) यांच्या पत्नी होत्या. त्यानी मला धीर दिला व थोडा वेळ थांबण्यास सांगितले. त्या काळात सावंतवाडी संस्थानमध्ये डॉ. सुवर्ण हे चीफ मेडिकल ऑफिसर होते. या शैक्षणिक पात्रतेचे डॉक्टर आसपासच्या परिसरात कोणीच नव्हते. ट्यूमरची मोठमोठी ऑपरेशन्स करून यापूर्वी त्यानी आपली योग्यता प्रस्थापित केली होती.

हॉस्पिटलमधून धन्वंतरी बंगलोसमोर एक पांढरी गाडी थांबली व डॉक्टर सुवर्ण पायऱ्या चढून आत गेले. एक दोन मिनिटे झाली नसतील एवढ्यात मिसेस सुवर्ण बाहेर आल्या व म्हणाल्या, ' आता तुझ्याबरोबर डॉक्टर येतील. तुझ्या आईला पहातील, मग औषध घेऊन जा. आईला बरं वाटेल काळजी करू नको.' डॉ. घरातून आले व आपल्या गाडीत बसले. मला गाडीत बसावयास त्यानी सांगितले. राजवाड्याकडून गाडी पुतळ्याकडे येताच शाळा नं. १ समोर गाडी फिरवण्याबद्दल ड्रायव्हरला मी सांगितले. डॉक्टरांची फी जास्त असल्याची वदंता असल्याने सहसा कुणी त्यावेळी त्याना नेत नसत. त्याप्रमाणे त्यांचे घरी जाणे क्वचितच असे. डॉ. सुवर्ण खोलीत गेले.

आई झोपलेली होती. ' टुमाला काय होते ?' डॉक्टरानी प्रश्न विचारला. ' पोटात आग होता. ' आई म्हणाली. डॉक्टरानी नाडी पाहिली. स्टेथॉस्कोप लावून तपासले. एक इंजेक्शन दिले. ' टुमी काळजी करण्याचा कारण नाय ' असे आईस म्हणून त्यानी मला पुन्हा गाडीत बसवून हॉस्पिटलमध्ये नेले. तीन दिवसांचे औषध दिले. कमीजास्त असल्यास भेटण्याबद्दल सांगितले. आईला ॲनिमिया असल्याचे त्यानी सांगितले. क्वीनोहिमोजीन नावाची बाटली आणून देण्याबद्दल त्यानी मला सांगितले. नंतर आईला लगेच गुण येऊ लागला. त्या आजारपणातून आई व आप्पा बरे झाले.

यातच माझी मॅट्रिकची पहिली सहामाही निघून गेली. त्यावेळी कळसूलकर हायस्कूलमध्ये शिक्षकवर्ग चांगला होता. श्री. तेंडोलकर इंग्रजी व्याकरण व इंग्लंडचा इतिहास शिकवत. श्री. शिवेश्वरकर गोडबोले, श्री. पिंगे (पिंगेज कोचिंग क्लासेसचे चालक) स्वतः रांगणेकर नॉन मॅट्रिक असूनही मॅट्रिकला इंग्रजीतून भूगोल शिकवीत. अर्धमागधी शिकविणारे मधू रांगणेकर वगैरे शिक्षक होते. दुसरे महायुद्ध व सिंगापूरचे बॉम्बिंग या वातावरणामुळे मुंबईच्या पालकवर्गाने आपली मुले कोकणात पाठविली होती. आमच्या मॅट्रिकच्या वर्गात त्यावेळी १२० मुले होती. प्रिलिमिनरी परीक्षा त्या काळात घेतली जाई. या परीक्षेत मिळविलेल्या गुणांवरून मी धरून ५६ विद्यार्थ्यांना फॉर्म मिळाला. या छपन्न विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी पास झाले. त्यात मी १३ व्या नंबरला पास झालो. आईवडिलांच्या आशीर्वादाने त्या काळात त्या परिस्थितीत मी आमच्या कुटुंबात पहिलाच मॅट्रिक पास होणारा विद्यार्थी. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, ज्या दिवशी मी मॅट्रिक पास झाल्याचे वृत्तपत्रात वाचले त्याच्या दुसऱ्या दिवशी माझी सावंतवाडीच्या पोस्ट ऑफिसात क्लार्क म्हणून नेमणूक झाल्याची पोस्टल सुपरिन्टेन्डंटकडून रत्नागिरीहून तार आली.

वरची रांग :–सौ. विद्या, श्री. स. फ., शांताबाई, गुं. फ., आका गोसावी.
खालची रांग :–महेश, संजय, प्रफुल्लदत्त, संतोष.

बसलेले–शांताबाई, राधाबाई, स. फ.
मागे उभे–गुं. फ.



कु. सुनंदा, ती. आई (संतोषसह), श्रीमति आका गोसावी

माझा आजार

१९४३ साल म्हणजे नोकरी मिळवून देणारेच वर्ष होते. सर्व वृत्तपत्रातून ' पाहिजेत 'च्या जाहिराती व दुसऱ्या महायुद्धामुळे बहुतेक कार्यालयात कर्मचाऱ्यांची उणीव भासू लागली होती. संक्रांतीच्या दिवशी मी हजर झालो. दोन चार दिवस मी काम केले असेल नसेल एवढ्यातच मलेरियामुळे माझी नोकरी टेंपररी असल्याने गेली. ४–८ दिवसानी कमाविसदार ऑफिस, बांदा यांच्या कार्यालयात माझी कारकून म्हणून नेमणूक झाली. तेथे चार पाच महिने काम करून झाल्यावर रत्नागिरीस पुन्हा हेड पोस्ट ऑफीसमध्ये माझी नेमणूक झाली. तेथून माझी सावंत-वाडीस बदली झाली. १९४४ मध्ये टेलिग्राफिस्टच्या ट्रेनिंगसाठी मुम्बईच्या पोस्ट मास्तर जनरलनी माझी निवड केल्याने विसाव्या वर्षी मी मुंबईस जाण्यास निघालो.

त्यावेळी खाजगी गाड्या असत. सबनीस स्टँडवरून गाडी निघताना निरोप देण्यासाठी आई, आप्पा, गुंडू वगैरे मंडळी आली. इतक्या लांबच्या ठिकाणीं कुणाची सोबत नसताना आईने मला केव्हाच पाठवले नव्हते. निरोप देताना तिच्या डोळ्यात पाणी आलेले आढळले. मोटारीत सफाळ्याचे कुणीतरी सामंत भेटले. त्यानी मला प्रथम निवासात नेले. तेथून नंतर भाई जीवनजी लेनमध्ये आतेच्या घरी नेले. टेलिग्राफचे ट्रेनिंग तीन महिन्यात पूर्ण केल्यानंतर माझी नेमणूक फाऊंन्टनवरील सेंट्रल टेलिग्राफ ऑफीसमध्ये टेलिग्राफिस्ट म्हणून झाली. ट्रेनिंगमध्ये असताना मला विद्यावेतन म्हणून ३० रुपये मिळत. पैकी वीस रुपये जेवणाचे म्हणून मी आतेला देत असे. मुंबईस असेपर्यंत माझे भोजनाचे पैसे देण्यात माझ्याकडून केव्हाच कसूर झाली नाही.

चार सहा महिन्यानी गुंडूही मुंबईस आला व प्रा. न. र. फाटकांच्या पत्राने मुंबईच्या छबिलदास हायस्कूलमध्ये नोकरीला लागला. आम्ही दोन्ही मुले मुंबईस आल्यामुळे व तांबोशाच्या घराकडे लक्ष देणारे

कोणीच नसल्याने आई व अप्पा तांबोसे येथे राहण्यास गेली. आप्पा मधूनमधून आजगावी जाऊन येत. मुलांच्या शिक्षणाचे ओझे आईवर आता राहिले नव्हते. १९४७-४८ या दरम्यान मी आजारी झालो कारण ऑफिसमधील रात्रपाळी व अनियमित रात्रपाळीचे काम माझ्या प्रकृतीला मानवले नाही. रात्री काम केल्यानंतर दिवसा आवश्यक असणारी झोप भाई जीवनजी लेनमधील घरी मला मिळणे शक्य नव्हते. इकडच्या तिकडच्या पाहुण्यानी व पाहुण्यांच्या मुलामाणसानी ती जागा इतकी गच्च झालेली होती की शांत झोप व तीही दिवसा हे शक्यच नव्हते. आजारपणात मी तांबोसे येथे आलो.

आजारातून मी पूर्ण बरा होण्यासाठी आईने तुळशी प्रदक्षिणांची संख्या ११ वरून १०८ वर नेली. नरसिंहवाडीस तुलाभार करण्याचा दत्त महाराजांकडे नवस केला. इतर औषधोपचार करण्यासाठी गुंडूस मुंबईहून बोलावून घेतले. मला घेऊन गुंडू वेंगुर्ले येथे मिशन हॉस्पिटल-मध्ये गेला तेथून तो मालवणला डॉ. सुवर्णकडे गेला व त्याना फोटो दाखविला. दरम्यानच्या मुदतीत मी तांबोसे येथे आलो. ह्या काळात डॉ. सुवर्ण मालवणहून दर शुक्रवारी म्हापसे येथे येत. तेथे 'मला दाखविण्यासाठी पेशंटला आणा' असे त्यांनी गुंडूस सांगितले. गुंडू तांबोसे येथे आला व 'येत्या शुक्रवारी सुवर्णाक दाखौक् सदगुरूक घेव्न जाव्क होयां.' असे त्याने आईला सांगितले. त्या कामास आईने परवानगी दिली.

तांबोसेहून पेडणेपर्यंत चालत जाऊन पुढे म्हापसे येथे मोटरने आम्ही दोघेही गेलो. सुवर्णानी माझा वेंगुर्ले येथे काढलेला फटो पाहिला. मला तपासले व नाकाचे हाड वाढले आहे, वाढलेला भाग काढला पाहिजे असे सांगितले. ऑपरेशनपूर्वी घेण्यासाठी तीन दिवसांच्या गोळ्या दिल्या होत्या. डॉ. सुवर्णाचा हा सल्ला आईस पसंत पडला नाही. 'माझ्या झिलाचां ऑपरेशन करूक मी देवचंय नाय.' असे आईने गुंडूला निक्षून सांगितले. गुंडूने पुष्कळच समज घालण्याचे काम करूनही ज्यावेळी आई आपला हेका सोडीना त्यावेळी 'तुका तेका मारूंचो आसा असा तुज्या वागण्यावरून दिसतां.' असे गुंडूने म्हणताच 'अरे, तो तुका जाव्क नाय माका झालोहा. तुझा प्रेम माका नको आसा. मी सद्गुरूचां ऑप्रेशन

करूंक देवचय नाय. तुझा काम झालां. तू आता मुंबैक जा.' असे सांगितले.

मनातून मलाही ऑपरेशन म्हटले की भीती वाटत असे 'आईची इच्छा नाही तर ऑपरेशन नको' असे मी गुंडूला सांगताच तोही नंतर शांत झाला व दोन दिवस राहून मुम्बईस गेला. तो जाताना आई त्याला म्हणाली, 'तू सद्‌गुरुची आता काळजी करू नको. मी काय तां आता बघतय. लोकां, म्हणत सद्‌गुरु कडकी लागलीहा म्हणून ती कडकी आसा की काय तेचो म कां सोक्षमोक्ष लावून घेवचो होतो. कडकेचो रोग नाय ह्या आता समाजलां.'

तांबोसे येथील माझ्या चार महिन्यांच्या वास्तव्यात माझे वीस पौंड वजन वाढलं. आईने माझा आहार चांगला ठेवला होता. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मी राम नामस्मरण करत असे. याच काळापासून रामरक्षा स्तोत्र (दिवसातून एक वेळ) म्हणण्याचा क्रम मी सुरू केला. नामस्मरणाचे महात्म्य फार मोठे आहे. आपले विचार व आचार बदलून टाकण्याचे फार मोठे सामर्थ्य त्यात आहे. ते क्षेत्र अनुभूतीचे आहे. विद्वान लोकांशी वाक्‌पांडित्य करून व अध्यात्मिक चर्चा करून त्या विषयाचे आकलन होणार नाही. मात्र सातत्याने अनुसंधानाची गरज आहे. प्रपंचामध्ये केव्हा केव्हा साधनेपासून आपली थोडी फार फारकत होते, नाही असे नाही; पण जाणीव होताच गाडी जाग्यावर येते हे निःसंशय.

जरा मला बरे वाटू लागताच नरसिंहवाडीला निघण्याचे आईने ठरविले. आम्ही नरसिंहवाडीस जाऊन पोहोचलो. त्या रात्री तेथील ब्राह्मणानी नरसिंहवाडीस प्लेगची साथ सुरू होण्याची शक्यता आहे असे सांगितले. उंदीर मरत असल्याने त्या साथीबद्दल उघड उघड चर्चा होऊ लागली. ती २७ जानेवारी १९४८ तारीख होती. तारीख २८ ला कृष्णानदीतील पाण्यात पायरीवर उभे राहून मी, गुंडू, आप्पा वगैरेनी स्नान केले. आईही आंघोळ करून आली. प्लेगच्या संभाव्य साथोबद्दल सेवेकरी लोकातही उघड उघड चर्चा सुरू झाली. आमच्या आईवर याचा काहीही परिणाम होईना. 'देव परीक्षा घेताहा माझी. अरे तुकां (दत्तमहाराजाना उद्देशून) मी ओळखतंय, सगळे गेले तरी मी मात्र

जावचंय नाय ' असे आई पादुकांसमोर उभी राहून बोलू लागली. आमच्या लहानपणी म्हणजे आम्ही दोन तीन वर्षाचे असताना नरसिंह-वाडीस पटकीच्या साथीत आम्हास घेऊन आई सहा महिने राहिली होती. त्यावेळी बरीच माणसे मृत्युमुखी पडली तरी आई तेथून ढळली नव्हती. या पूर्वीच्या अनुभवावर ती जरी हे बोलली असली तरी जाणूनबुजून या परिस्थितीत नरसिंहवाडीस राहणे आम्हास योग्य वाटत नव्हते.

माझा तुलाभार व्हायचा होता. ता. २८ च्या रात्रीपर्यंत मी, गुन्डू व आप्पा (वडील) यांचे नरसिंहवाडीतून बाहेर जाण्याबाबत एकमत झाले. आईचा विरोध कायम राहिला. २८ तारखेला आम्ही झोपी गेलो व पहाटे गुन्डू खडबडून जागा झाला. तो घाबरलेला होता. ' मला भीती वाटते.' तो म्हणाला, भीती वाटण्याचे कारण ' दत्त महाराजानी ताबडतोब दत्तवाडी सोडण्याबद्दल स्वप्नात सांगितले.' असे तो म्हणाला. ' अरे, मनात आसतां तां स्वप्नात दिसतां. अरे तुम्ही दोन आणि तिसरो तुमचो बापूस– तुमका नरसोबाच्या वाडीक रवाचाच नाय आसा. तेवा तुम्ही तिघंय जाण एक होवन नरसोबाच्या वाडीतून भायर जावचां ठरवल्याहात ता माकां कळणानाय ? माकां सांगूक कित्याक येऊक नाय तो दत्त महाराज ?' असे म्हणून निघण्याचा प्रश्न तिने उडवून लावला.

एवढ्यात मंगल कार्यालयाचे राजोपाध्ये आमची गडबड ऐकून तेथे आले व 'जर महाराजानी स्वप्नात तुमच्या मुलाला निघून जाण्याबद्दल सांगितले असेल तर थोडे दिवस तुम्ही शेजारच्या गावी जाऊन राहणे योग्य, काशीबाई.' असे सांगितले. काशीबाई आईचे घरचे नाव. आईने नाइलाजाने या निवाड्यास मान्यता दिली व आम्ही जयसिंगपूरात राहण्याचे ठरवून २८ तारखेला सायंकाळी ५ वाजता जयसिंगपूरला रस्त्यावर उतरलो.

•

जयसिंगपूर

जयसिंगपुरात आमच्या परिचयाचे कोणीच नव्हते. बिऱ्हाडासाठी जागा पाहण्यापासून सुरुवात व्हावयाची होती. आमचे आप्पा जागा शोधण्यासाठी बाजारात गेले. गुंडूही 'जरा फिरून येतो' असे म्हणाला. मी व आई सामान संभाळण्यासाठी रस्त्यावर (कडेला) राहिलो. रस्त्यावरून गाड्या जात येत होत्या. लोक जात येत होते. मधून मधून काही अंतरावर लोक जात येत. मधून मधून काही अंतरावर गुरेढोरेही जाताना येताना दिसत होती. आणखी थोड्या वेळानंतर जो तो आपल्या घराच्या दिशेने जाणार होता. आम्हाला मात्र रस्ता हाच निवारा व आकाश हेच छत्र होते. दिवे लागणीची वेळ येत चालली होती. नरसिंहवाडी-कोल्हापूर रस्त्यावर दोन्ही दिशाना फिरून गुंडू किंवा आप्पा दिसतात तर मी पाहत होतो. तेवढ्यात गुंडू येताना दिसला. सोबत तीन चार विद्यार्थी येताना दिसले. त्या विद्यार्थ्यांनी आम्हाला धीर दिला. आमचे सामान स्वतः घेऊन आपल्या मागोमाग यावयास सांगितले.

आम्हाला बिदनुरकर यांचे घर दाखविण्यात आले. त्या घराच्या एका भागात एक ५५ ते ६० वयाचा थोराड वृद्ध होता. दुसरी बाजू आम्हाला देण्यात आली. ज्या चार पाच विद्यार्थ्यांनी आमची सोय केली त्या विद्यार्थ्यांबद्दल चौकशी करता ते संघाचे स्वयंसेवक असल्याचे समजले. नरसोवाडीवरून परतणे आईच्या दृष्टीने समाधानाची बाब नव्हती. जागा मिळाल्यामुळे आम्ही आनंदात होतो. त्या दिवशी भोजन होईपर्यंत रात्रीचे बारा वाजले. त्या काळात जयसिंगपूर सर्वसामान्य गाव होते. दुसऱ्या दिवशी गावात इतरत्र फिरलो. शेजारी असलेल्या लोकांबरोबर ओळखदेख होण्याचा योग आला. संघाच्या स्वयंसेवकानी आम्हाला जागा शोधून कशी दिली हेही नवपरिचिताना आम्ही सांगून टाकले. नरसिंहवाडी सोडावी लागल्याने आईच्या चेहऱ्यावर मुळीच

समाधान नव्हते. ती जरा घुमीच होती. असे असले तरी आम्ही तिघे एकाच मताचे असल्याने तोही दिवस आमचा चांगला गेला.

ता. ३० जानेवारी म्हणजे जयसिंगपूरला पोहोचल्यापासूनचा तिसरा दिवस होता. सायंकाळी ६ च्या दरम्याने रस्त्याच्या पलिकडे एक जमाव दिसला हा हा म्हणता गर्दी झाली म्हणून मीही तेथे गेलो. रेडिओवर वल्लभभाई पटेल राष्ट्राचे सांत्वन करीत होते. महात्मा गांधीचा खून एका वेडयाकडून घडल्याचे ते सांगत होते. ती बातमी ऐकून मी इतरां-प्रमाणेच दुःखी झालो. बातमीवर विश्वासच बसेना. तथापी बातमी समक्ष ऐकल्याने लगेच मी बिऱ्हाडी आलो व सर्वांना महात्माजींच्या दुःखद निधनाबाबत बोललो, त्या रात्री आम्ही तयार असलेले भोजन जेवू शकलो नाही. दुसऱ्या दिवशी मारेकरी एक ब्राह्मण असल्याचे समजताच कोल्हापूर, सांगली, सातारा भागात ब्राह्मण दिसला की मार अशी अवस्था झाली. जयसिंगपूरच्या आ पासच्या गावची ब्राह्मणांची घरे जळू लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या. नथूराम गोडसे यांचा संबंध संघाशी होता अशी अफवा पिकली व संघीयाना फार त्रास झाला.

आम्हा दोन्ही भावांच्या गळयात जानवी असल्याने व तीन दिवसापूर्वी संघ य विद्यार्थ्यांनी आम्हाला जागा बघून दिली असल्याने आमच्याकडे 'संशयित' म्हणून पाहिले जाऊ लागले. ब्राह्मणाना रस्त्यावर ओढून, घरात घुसून मारले जात होते. नरसिंहवाडीला ब्राह्मण लोकाना भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागल्याच्या बातम्या तेव्हा येऊ लागल्या. तारीख ३१ रोजी रात्री आमच्या बिऱ्हाडाच्या दरवाज्यावर मोठयाने लाथ मारली गेली. लाथेबरोबरच 'बाहेर पडा' असा ओरडून बोलण्याचा आवाज आला. आश्चर्य असे की, तो आवाज शेजारच्या थोराड म्हाताऱ्याचाच होता. रस्त्यावर हळूहळू जमाव जमत असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून कळून येत होते. रात्री घरावर थोडे थोडे दगड पडू लागले. आम्ही प्रवासी ब्राह्मण असल्याचे त्याना कळले असेल अगर इतर काही बेत असेल. तो दिवस तेवढयावरच संपला. अविचारी लोकांसमोर शौर्य दाखविण्याची संधी कशी मिळणार ?. एक एक तास तास म्हणजे एकेक वर्ष वाटत होते व ती रात्र आम्ही गुपचूप जागून काढली. आईचा 'दत्तगुरू' जप सुरू होता. 'आपण मुम्बयुक

जाणा बरां ' गुन्डू आईला उद्देशून बोलला. ' तुका सपान पडलां की काय ?' आईने विचारले ? ' सपान बिपान काय नाय पण माका वाटता तां तुका सांगतय.' गुन्डू म्हणाला. आईने पूर्वीसारखा त्रागा केला नाही. ' देवाक् कोणच नको असां दिसतां.' रवांदे एकटोच तेकां, एकटोच रवांचे दुवाळ तेका झालेहत. तेची इच्छा एकदा पुरी व्होंव दे. अरे गुन्डूऽऽऽ मी आयुष्यभर देव देव करतंय पण स्वप्नात तुका तो येव्न भेटलोऽऽऽ. तू आता माझ्यापेक्षा ज्ञानी झालंय असा दिसता. तू आता मुम्बैक म्हणतय तर मुम्बैक जाव्या.' आईची संमती मिळताच मुम्बईस जाण्याची तयारी करण्याच्या दृष्टीने सामानाची आवराआवर सुरू झाली.

रेल्वे स्टेशनपर्यंत जाणे शक्य होण्यासाठी संरक्षण हवे होते. माझ्याकडे सेंट्रल टेलिग्राफ ऑफिसचे ओळखपत्र (Identity Card) होते. त्याच्यावर मुम्बईच्या पोलीस कमिशनरचा वर्तुळाकार शिक्का होता. त्या ओळखपत्राचा उपयोग करून पोलीस संरक्षण मिळेल असे वाटल्यावरून मी व गुन्डू पोलीस स्टेशनवर गेलो. तेथील पोलीस हवालदाराला वस्तुस्थिती सांगितली व ' आम्हाला मुम्बईस जाण्याच्या दृष्टीने पोलीस संरक्षण मिळावे ' अशी विनंती केली.त्यानेही लगेच एक पोलीस संबत पाठविला. ड्रेसमधील एका पोलीसामुळे आम्हाला मोठा धीर आला. शेजारचे खादी टोपीवाले पाटील व पोलीस यांच्या सोबतीने आम्ही सर्वांनी जयसिंगपूरचे बिऱ्हाड सोडले व रेल्वे स्थानकावर येऊन रेल्वेत बसलो.

कोल्हापूरपासून नरसिंहवाडीपर्यंत ब्राह्मण जमातीस किती त्रास झाला याची चर्चा त्या काळात आगगाडीतील प्रत्येक डब्यात सुरू होती. मुम्बईस मोरारजीभाईंकडे गृहखाते असल्याने या ब्राम्हणद्वेषातून निर्माण झालेल्या कटकटीचा मुम्बई शहरात कुणासच त्रास झाल्याचे आढळले नाही. गृहमंत्री म्हणून सावधगिरी पण कडक पावले त्यानी पूर्वीच उचललेली होती. मुम्बईस आम्ही तीन महिने होतो. गुन्डू आपल्या नोकरीमुळे तेथे राहिला व बेळगाव मार्गे आम्ही तांबोसे येथे परतलो. मुम्बईची माझी नोकरी म्हणजे रात्रपाळी दिवसपाळीची होती. मला त्या नोकरीचा वीट आला होता. मोठ्या पगाराची नोकरी हवी अशी इच्छाही नव्हती. ' उपासनेला दृढ चालवावे.' या दृष्टीने जीवन वेतन

देणारी नोकरी मिळाली तरी चालण्यासारखी असल्याने रत्नागिरी स्कूलबोर्डाकडे प्राथमिक शिक्षकाच्या जागेसाठी गावाहून मी अर्ज पाठवला.

•

माझ्या नोकऱ्या

सप्टेंबर '४८ मध्ये शिरोडा मराठी शाळेत उपशिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली असल्याचे रत्नागिरी स्कूलबोर्डाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरकडून मला कळविण्यात आले. सावंतवाडीला त्यावेळी अष्टपुत्रे नावाचे चीफ-मेडिकल ऑफिसर होते. त्यांच्याकडून प्रकृती तपासून घेऊन मी फिट् सर्टिफिकेट लगेच मुंबईच्या तार ऑफिसात पाठवून देऊन हजर झालो व लगेच राजीनामा सादर करून मंजूर करून घेतला व शिरोडे येथील मराठी शाळेत १३ सप्टेंबर १९४८ मध्ये हजर झालो. तेथून माझी रेडी येथे बदली झाली. आई, वडील व मी एकत्र राहण्याच्या दृष्टीने कमी पगाराची नोकरी सुखदायक ठरली. पुढे खेर मंत्रिमंडळाने हायस्कूलमधील पाच ते सात इयत्तांचे इंग्रजी काढून टाकल्याने छबिलदास लल्लुभाई बॉईज हायस्कूलमधून प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षकांची कपात झाली. अर्थात गुन्डू मुंबईहून रत्नागिरी स्कूलबोर्डात शिक्षक म्हणून आला. त्याची टांक येथे नेमणूक झाली. रत्नागिरी स्कूलबोर्डात दोन तीन वर्षे राहून नंतर तो मुंबई नगरपालिकेमध्ये प्रा. शिक्षक म्हणून गेला.

रत्नागिरी स्कूलबोर्ड खात्यात प्राथमिक शिक्षक असताना त्याने आप्पाच्या नावावर ' प्रणाम ' नावाचे पाक्षिक सुरू केले होते. हे पाक्षिक वेंगुर्ले येथील नागरिक प्रिंटींग प्रेसमध्ये छापून घेतले जात असे. शिक्षक संघटना, प्रशासन व प्राथमिक शिक्षण यांबाबतच्या समस्या त्यातून चर्चिल्या जात असत. आम्हा दोघाही बंधूवर त्या काळात खात्याची बारीक नजर होती. गुन्डूला त्याचा परिणाम म्हणून १९५०-५१ मध्ये कळसुलीला बदलण्यात आले. तीन चार वर्षांनी माझ्यासाठी राजापूर तालुक्यातील तळगाव गाव निवडण्यात आला. तळगावला बदलीच्या

ठिकाणी मी जाणार नव्हतो, पण आईने 'नोकरी सोडू नको– मी बरोबर येतंय.' असे सांगितल्याने तळगावी जाण्यास निघालो.

सोबत सामान होते. फोंडा मार्गे खारेपाटणला मी व आई सूर्यास्ताला येऊन पोहोचलो. विजयदुर्गची खाडी ओलांडून पूर्वेकडे चढण चढू लागलो. ते डिसेंबर '५३ मधील दिवस होते. एका हातात हँडबॅग दुसऱ्या हातात पितळेचा डबा घेऊन पाय कसेबसे पुढे टाकावे लागत होते. एका हातात अंथरुणाची वळकटी व काखेत बोजा अशा अवघड परिस्थितीत आईला संधी प्रकाशात रस्ता कापावा लागत होता. तेवढ्यातच प्रवासात एका लहान मुलाची भेट झाली. राजापूर तालुक्याच्या हद्दीतून प्रमुख रस्ता ओलांडून उजवीकडे डोंगरावरून पायवाटेने भुरकट काळोखातून पुढील प्रवास करावयाचा होता. किमान तीन मैल अंतर पायी जायचे होते. डोंगर, दगड व माती याशिवाय काही दिसत नव्हते. काही ठिकाणी पायवाट इतकी अरुंद होती की, फक्त एकाच माणसाला तारेवरची कसरत करून जावयास मिळावी. प्रत्येक पाऊल अर्ध्या फुटावर टाकून ते प्रथम स्थिर करावे लागे. नंतर दुसरे पाऊल पुढे टाकावे लागे. शरीराचा तोल सांभाळला जाईल याची खबरदारी घ्यावी लागे उजवीकडील डोंगर आकाशाच्या दिशेने असलेल्या सह्याद्रीला टेकून उभा होता तर डावीकडची घसरी उतरण. खारेपाटण राजापूरच्या रस्त्यावर पाय घसरून पाठीवर पडण्याइतकी कलंडली होती. पाऊलवाट चिचोळी होती. मधून मधून गुळगुळीत गवताच्या काड्या पाय टिकू देत नव्हत्या. अशा वेळी आई बसून दोन्ही हात जमिनीला टेकून पायाने पुढे सरके. माझ्या बदलीमुळे तिच्यावर आलेली ही आपत्ती पाहून माझ्या मनाला असह्य वेदना झाल्या.

रात्री साडेसात आठच्या दरम्यान तळगावला मुख्याध्यापक जोगले यांच्या घरी येऊन पोहोचलो. राजापूर भागात फुरशांचा सुकाळ असला तरी त्या प्रवासात आम्ही सुरक्षित राहिलो. तळगावातील बहुतेक सर्व घरे म्हणजे गवती छपरांची. अशाच एका गवती घराच्या पडवीत आम्हास राहावयास जागा मिळाली. काथ्याची पूर्व–पश्चिम दोरी बांधून आईने आपले एक जुने लुगडे वर टाकले व पार्टीशन केले. हा पडदा वाऱ्याने वर अगर बाजूस आजूबाजूस उलटू नये म्हणून एका बाजूस

पोळपाट व दुसऱ्या बाजूस सांडेवरील चंदनाचा भला मोठा तुकडा ठेवला. पाणी आणण्यासाठी तिला दोन ते अडीच फर्लांग सखल भागात जावे लागे. केरोसीन डब्याचा वरचा पत्रा काढून तिने पाणी तापविण्यासाठी उपयोग केला. पितळेच्या डब्यातून पाणी आणीत असे व विहिरीतून पाणी काढताना मिल्क कॅनचा उपयोग करत असे. आंघोळीचे पाणी मोफत जाऊ नये म्हणून स्नान करण्याच्या ठिकाणी आईने कोणते ना कोणते रोप लावले होते. माझ्या आठवणी-प्रमाणे ते मिरची व वांग्याचे रोप होते. जेवल्यानंतर तोंड धुण्यासाठी वापरलेले पाणी मोफत जाऊ नये कोणत्या ना कोणत्या वनस्पतीला अगर झाडाला ते उपयोगी पडावे अशी आईची नेहमी दृष्टी असे. त्याप्रमाणेच ती तळगावात ६ महिने राहिली. मला त्या भागात तिने सोबत केली.

१९५४-५५ मध्ये मी कणकवली येथील तालुका स्कूलमध्ये तळगाव-हून बदलून आलो. वेलकम स्टोअरचे मालक श्री. ओरोसकर यांचे घरी राहावयास होतो. तेथे असताना मी आजारी झालो. डॉ. वरवडेकर यानी तापाचे निदान टायफाईड असे केले. ओरोसकर हे कणकवलीमध्ये ओरोसकर मास्तर म्हणून प्रसिद्ध होते. माझ्या आजारात त्यानी माझी उत्कृष्ट शुश्रूषा केली. माझ्या आहारामध्ये त्यानी पथ्यपाणी पुष्कळ सांभाळले. वेलकम मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस मला खास खोली देण्यात आलेली होती. त्यांच्या विलास नावाच्या मुलाला मी शिकवत असे. माझ्या आजाराची तीव्रता कमी झाल्यानंतर त्यानी आजग वला आईला व आप्पाना कळविताच त्यांचे कणकवलीस येणे झाले. माझ्या आजारातील पथ्यपाणी पाहून आईला बरे वाटले. ताप कमी झाला नव्हता व अशक्तपणाही होता. माझ्या आजारात ओरोसकर मास्तरांच्या कुटुंबावर जादा दोन माणसांचे ओझे पडू नये असे वाटल्यावरून तसेच नरसिंहवाडीच्या दत्ताला पूर्वी केलेल्या तुलाभाराच्या नवसाची आठवण झाल्यावरून ओरोसकर मास्तराना आई म्हणाली, ' सद्‌गुरूच्या आदल्या सिकपणातलो नवस पुरो करूंचो रवलोहा. तो पुरो करूंक आम्ही नरसोबाच्या वाडीक जाव्‌न देवाचां काम पुरां करतव. तुम्ही इतकी काळजी घेताहात की आमची दोघांचीही हंय जरूरी नाय. नरसोबाच्या

वाडीक जावन दत्ताक प्रदक्षिणा सुरू केल्यो की तेका बरां वाटत जातलां, त्या दोन दिवसातील आईच्या उपोषणाची व सोवळ्याची दैनंदिनी ओरोसकर मास्तरानी व त्यांच्या पत्नीने पाहिल्यामुळे त्यानी माझ्या आईस व आप्पास जाण्यास परवानगी दिली.

•

पुनश्च

आई व आप्पा नरसिंहवाडीस पोहोचल्याचे पत्र आले व चमत्कार असा की, त्याच दिवसापासून माझा ताप नॉर्मलवर आला. आमच्या आप्पाना उपास तापास, सोवळे ओवळे, पूजा अर्चा यात काहीही स्वारस्य नव्हते. ते देव मानीत पण त्याचबरोबर ' नशीबात आसां तां होतलां ' असे ते म्हणत. पैसा असला तर खर्च करण्यात उदार कर्ण व नसला तर गुंडाळलेल्या बिछान्याला अगर पाटाला टेकून तो दिवस ते घालवीत. या बाबतीत आई व आप्पा दोन टोके होती. अशा परिस्थितीत आप्पा नरसिंहवाडीला कसे राहू शकणार होते ?

थोडे दिवस झाल्यावर आईला नरसिंहवाडीस ठेवून ते परस्पर आजगावी आले व तसे त्यानी मला पत्र पाठवून कळविले. वीस पंचवीस दिवसानी नरसिंहवाडीहून राजोपाध्ये यांचे मला पत्र आले त्यात लिहिलेल्या मजकुराचा आशय असा होता ' सकाळपासून संध्याकाळपर्यंत काशीबाई महाराजांच्या पादुका सभोवार प्रदक्षिणा घालीत असल्याने तिच्या पायाला भोक पडले आहे. तसेच वारंवार केलेल्या उपासाने ती अशक्त झाली आहे. तिला घेऊन जाणे बरे.' ताप जाऊन मला १५–२० दिवस झाले होते. अशक्तपणा होता पण वरील पत्र आल्याने मला कोठून शक्ती आली कोण जाणे पण दुसऱ्या दिवशीच नरसिंहवाडीस जाण्याची मी तयारी केली व निघालो.

नरसिंहवाडीस सायंकाळी पोहोचल्यावर बिऱ्हाडी गेलो. आई दत्त मंदिरात असल्याचे समजले. तेथे जाऊन पाहतो तर आईच्या क्षीण चालीने प्रदक्षिणा चालल्या होत्या. मला पाहताच खुणेनेच तिने उभे राहण्यास सांगितले. १०–१५ प्रदक्षिणा संपल्यावर ' कित्याक इलंय ?'

असा क्षीण आवाजात प्रश्न विचारला. समोरील खांब्याकडे ती बसली. तिच्या तळपायाच्या साली निघाल्या होत्या. आजुबाजूच्या उपासक भाविकानी 'या म्हातारीला लवकर घेऊन चला नाहीतर ती मरेल.' असे मला कळवळून सांगितले 'माझ्या सद्‌गुरुचो तुलाभार करूंचो असा. उद्या काम पूर्ण करून टाका.' आई तेथील एका ब्राह्मणाला म्हणाऊी. दुसऱ्या दिवशी दुपारी तुलाभार करण्यात आला. मला एका पारड्यात व दुसऱ्या पारड्यात माझ्या वजनाइतके नारळ ठेऊन व ते दान करून माझे आयुष्य दत्तमहाराजांकडून आईने वाढवून घेतले.

ते काम पूर्ण होताच आई माझ्याबरोबर निघेल असे मला वाटले होते. पण तसे निघण्याचे तिचे चिन्ह दिसेना. मी गुंडूला मुंबईला पत्र पाठवून सर्व हकिगत कळविली. 'आपण आजारी असल्याने निघा' अशी त्याने मुंबईवरून तार केली. पत्र जाऊन तार मिळेपर्यंत तीन चार दिवस गेले. आईचा नित्यक्रम सुरू होता. तार मिळाल्याबरोबर मी देवळात गेलो. प्रदक्षिणा काढत असताना अगर माळ ओढत असताना ती केव्हाच बोलत नसे. तास झाला... दोन तास झाले तरी आई काही बोलेना. मग मीच म्हणालो. 'गुंडू शीक आसां. तार इलीहा.' आईने माझं बोलणे ऐकून 'त्या तारेत काय अर्थ नाय तू कायतरी पत्र लिलंय आसतालां. मी हैसरसून भायर पडण्यासाठी तेणी ती खोटी तार केलेली आसा. मी येणय नाय. तूय जाव नको.' असे तिने सांगितले. 'आई तुझो तारेवर विश्वास नसलो तर ठेव नको. मी मात्र आताच्या गाड्येन जातंय.' असे सांगून तेथून दोन चार पावले (निघण्यासाठी म्हणून) टाकताच 'शूऽऽऽ शूऽऽऽ' असा आवाज करून आईने माझे लक्ष आपणाकडे वळविले व हाताने थांबण्याची खूण केली. मीही देव्हाऱ्याकडे येऊन उभा राहिलो.

आईने प्रदक्षिणेचे काम पूर्ण केले देव्हाऱ्यासमोर उभी राहून मनातल्या मनात काहीतरी पुटपुटली. पिशवीतील ताम्हण काढून त्यातील फुले खाली ठेवली. खाली वाकली व थडाथड आपले कपाळ पादुका असलेल्या उंबरठ्यावर आपटण्यास व रडण्यास सुरुवात केली. तिच्या डोळ्यातून ढसाढसा पाणी यावयास लागले. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. या तारेच्या लफड्यात उगाच पडलो असे होऊन गेले

आई दत्त पादुकांच्या समोर बसून ' तुकां माझी सेवा नको आसा. मागे इलंय तर येवच्या अगोदर घालवंलय. आता इलंय तर ताय तुझ्यानं बघवणानाय ! तू देव आसय काय खाडगी आसय ? लोकांच्या पोरांची ल्हान ल्हान आसताना लग्ना होतत व माझ्या पोरांची मात्र तीस पस्तीस वर्षापर्यंत होणत नाय. तुका माझा ह्या शेवटाचा सांगणा आसा. तो गुंडू जो लगीन नको नको म्हणता तो लगीन लगीन म्हणान मॅड होऊक होयो. तर मग मी तुझा देवपाण मानतलय. नाय तर तुका गुंडो म्हणतलय. समाजलां ?' असे म्हणून पूर्वीप्रमाणेच पुन्हा दात आवळून व डोळे मोठे करून उंबरठयावर जोराने दोनतीनदा कपाळ आपटले. आई श्रद्धेने जरी देवाला हे सांगत असली तरी यांचा परिणाम मुंबईला असलेल्या गुंडूवर कसा होणार ? गुंडूचे वय ३५ होते व आजवर आलेल्या मुलींना त्याने नकार दिला होता.

आई उभी राहिली. आपल्या पिशवीतला करंडा उघडून चिमटीभर कुंकू खाली सोडले व पिशवी घेऊन माझ्याकडे पाहत म्हणाली, ' आता खय तो घेवन जा.' आईच्या कपाळाला तीन चार मोठी टेंगळे आलेली होती व तिचे कुंकू कपाळभर पसरलेले दिसले. नरसिंहवाडीच्या स्थानाची तिची आवड व देवाला उद्देशून घातलेल्या शिव्या यांचा अर्थाअर्थी संबंध मला कळना.

मी तिला घेऊन बिऱ्हाडी आलो. राजोपाध्ये यांच्या आईला सांगून त्याचा आम्ही दोघानी निरोप घेतला. ' म्हाराजाक माझी सेवा नको आसा म्हणून ते असा करतंय ' असे सांगून आई राजोपाध्ये यांच्या आईकडे ओक्साबोक्शी रडू लागली. आईने अधिक कष्ट करू नये तिच्या पायांचे दुखणे कमी होऊन जखम बरी व्हावी म्हणून मीच गुंडूला तो आजारी असल्याची तार करावयास सांगितले होते. तसे जर केले नसते तर आई नरसिंहवाडीहून निघाली नसती. या सर्व गोष्टी करावयास मीच कारणीभूत झालो असल्याने आईचे आत्मक्लेश मला असह्य झाले. आईचे दुःख कमी व्हावे असा माझा प्रामाणिक प्रयत्न चालू असताना तिला होणाऱ्या या यातनास मी जबाबदार नसल्याचा मी समज करून घेऊन माझ्या मनाचे सात्वन करीत आईस मुंबईस आणले. मुंबईस दोन तीन महिने राहिल्यानंतर तिला घेऊन मी आज-गावी आलो व तेथून नोकरीवर गेलो. ●

माझे लग्न

नरसिंहवाडीच्या दत्ताला आईने जे गुंडुच्या लग्नाचे सांगणे केले होते ते फळास आले. त्याच वर्षी गुंडूचा विवाह झाला.

गुंडूचे लग्न होईपर्यंत माझा विवाह होये नये असा आईचा ठाम निर्धार होता. ज्या ज्या वेळी गुंडूला मुली सांगून येत होत्या त्या त्या वेळी त्याने नन्नाचा पाढा सुरू ठेवलेला असे व ' अगोदर थोरल्याचा आणि नंतर धाकट्याचा असा आईचा निर्धार असे. या निर्धाराप्रमाणे गुंडूचा विवाह झाला. व माझ्या विवाहाच्या बाबतीत आईने परवानगी देताना सांगितले. ' लग्न करताना चेडू कुडाळदेशकरांचा होयां ' ह्या लक्षात ठेव, त्या दरम्यानच्या काळात मी कुडाळ तालुका स्कूलमध्ये शिक्षक होतो. तेथे आमच्याच ज्ञातीची मालिनी श्रीराम ठाकूर नावाची एक शिक्षिका होती. या शिक्षिकेच्या बाबतीत वधूपक्षाकडून विचारले गेल्याने व मलाही तिचे वागणे पसंत पडल्याने थोरल्या बंधूची व वडलांची संमती लागणार असल्याचे मी त्याना सांगितले. सर्व हकिगत मुंबईस कळविली. मुम्बईहून गुन्डू आला व म्हापणला जाऊन त्याने वधुपक्षाकडील मंडळीबरोबर बोलणे करून लग्न पक्के ठरविले.

लग्न ठरले खरे पण माझ्याकडे खर्चासाठी पैसे नव्हते शिक्षक झाल्यापासून लग्न होईपर्यंतचा काळ म्हणजे जमाखर्चाची तोंडमिळवणी न होण्याचाच काळ होता. माझी प्रकृती मधूनमधून बिघडे. बिनपगारी रजेचे प्रमाण वाढते होते. येणारा पगार खर्च होण्यासाठीच असे. देण्याच्या रकमा डोळयांना दिसत. असे असले तरी बचतीची कल्पना माझ्या मनावर केव्हाच प्रभाव टाकू शकली नाही. चालू काळाचाच मी विचार करत असे. भविष्याची चिंता मला कधीच वाटली नाही. विवाहाच्या बाबतीत खर्चाचा प्रश्न का यावा असे मला वाटे. निमंत्रणे, जेवणावळ, मोठ्या प्रमाणावर धार्मिक विधी व इतर प्रदर्शनाची काहीही जरूरी

नाही असेच माझे मत होते. जेव्हा मी आप्पांना लग्नाबाबत बोललो तेव्हा ते म्हणाले, 'मुलीकडील माणसांकडून काय घेवंचा ठरवलंय ? 'पैसा नको' असे मी त्याना सांगितले असल्याचे म्हणालो, 'अरे, तू मूर्ख कसो ? असलो खुळो व्यवहार करूंक कोणी सांगितलां ?' असा प्रश्न आप्पानी विचारला. जरूर तेवढा धार्मिक विधी करून विवाह कार्य आटोपते घेता येईल असे म्हणताच 'तर मग लग्न सावंतवाडीक झालां तर बरा– गावात नको.' असे आप्पानी सांगितले व वर पुस्ती जोडली. 'तुझ्या आवशीक आदल्या दिवसाक कळात असां पत्र पाठव तुझ्या सुधारकी लग्नात तां इलां तर लग्नात विघ्न होतला.'

विवाह तारीख १७ मे १९५७ होती. गुन्डू ४०० रुपये घेऊन आला होता. थोडक्यात विधीपूर्वक विवाह करणारा पुरोहित पाहिला. गावात इतरत्र विवाह सोहळे असल्याने व वाजप सनई वगैरे मिळाली नसल्याने सनईची रेकॉर्ड गुन्डूने भाटांकडून मिळविली. लग्नाच्या आधल्या दिवशी आप्पानी गावच्या देवाला व घरातील देवाना निमंत्रण देऊन मध्यरात्री सावंतवाडीची वाट धरली व लग्नाच्या दिवशी पहाटे सावंतवाडी मुक्कामी येऊन पोहोचले. विवाहाला वर पक्षाकडील आठ माणसे व वधूपक्षाकडील पाच सहा लोक अशा प्रचंड गर्दीत शुभमंगलाच्या उद्घोषात एकमेकांच्या गळ्यात माळ पडत असताना आई येऊन दत्त म्हणून समोरच हजर राहिली. तिचा चेहरा गंभीर होता. पोर्तुगीज सरकारने गोवा हद्द बंद केल्याने तांबोसे मोरगावच्या रानवाटेतून बांदे येथे येईपर्यंत रात्रभर ती वाट चालत होती असे मागाहून समजले. बांदे सावंतवाडी गाड्या गच्च गर्दीमुळे तिच्या चुकल्या व सावंतवाडीस येईपर्यंत तिला वेळ लागला. मी कितीही मोठा झालो तरी आईची भीती ही वाटत असे. आता आई पुढे काय करते याची वाट पहाण्याकडे सुद्धा माझं लक्ष नव्हते. एवढ्यात 'भटजी, मंगलाष्टके पुन्हा म्हणा. माका अक्षता टाकूच्यो आसत.' आई म्हणाली, भटजी माझ्याकडे पाहू लागताच 'त्याप्रमाणे करा.' असे मी भटजीना म्हणालो. भटजीनी त्याप्रमाणें पुन्हा मंगलाष्टके म्हणताच आईने व जमलेल्या प्रचंड गर्दीने पुन्हा अक्षता टाकून आमच्या विवाहावर शिक्कामोर्तब केले. त्या दिवशी संकष्टी असल्याने त्याच दिवशी आई आजगावी

पुढे गेली. आम्हाला मागाहून येण्याबद्दल तिने सांगितले. तिच्याबरोबर सोबत सुनंदा होती. सायंकाळी मी, गुंडू, सौभाग्यवती व आप्पा आजगावी जाऊन पोहोचलो. सौभाग्यवती विद्या हिला (विवाहानंतरचे नाव) लांबण दिव्यासह आजगावच्या घरात आईने नेले व नंतर तिचे समाधान झाले. संकष्टीचे भोजन रात्रौ ११–३० वाजता झाल्यानंतर विवाह सोहळयाचे ओझे हलके झाले.

●

आईची जिद्द

१९५७-५८ साल असेल माझी रत्नागिरी ट्रेनिंग कॉलेजमध्ये सिनिअर ट्रेनिंगच्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली. विवाह १७ मे ला व १२ जूनला रत्नागिरीत प्रयाण झाले. दरम्यानच्या काळात तांबोसे येथील घराच्या भिंती अतिवृष्टीमुळे पडल्याची बातमी आईला मिळाली. जुलै–ऑगस्ट महिना होता तो. गोव्याची हद्द जाण्यायेण्यास बंद होती. पावसाळ्यात कोसळलेल्या भिंती उभ्यो कशो करूंक येतल्यो ? असा विचार आप्पांच्या तर ' पावस पडांदे नाय तर हौर येवं दे... माका ताबोशाक सोडून या.' असे आईचे म्हणणे. आईचा जाण्याचा निर्धार पाहून आईला व सुनंदाला मोरगावच्या हद्दीवर आप्पानी नेऊन सोडले. जाताना आप्पानी आपल्या नेहमीच्या शैलीप्रमाणे ' घर व्हावान् गेला आणि तुम्ही व्हावान् गेल्यात् तरी माका कळव् नकात्, असा त्यांना हद्दीवर निरोप दिला. अडचणीच्या वाटेतून आई व सुनंदा (माझी मावस बहीण) तांबोसे येथे जाऊन पोहोचली.

वाटेत पोर्तुगीज सैनिकानी चौकशी केली असता तिने त्याना आपल्या घराची परिस्थिती नेऊन दाखविली. वानरानी घराच्या छप्परावर हैदोस घातल्याने मातीच्या भिंती बऱ्याच ठिकाणी भिजून कोसळलेल्या अवस्थेत होत्या. घरातील भांडी व इतर साहित्य यांवर मातीचे छोटे ढीग उभे राहिले होते. कोंबडी व कुत्री यांनी आपले आश्रयस्थान केलेले घर पाहून आईला झालेले दुःख शब्दानी वर्णिता येणार नाही. बापूच्या झिलाच्या घरात थोडे दिवस राहण्यासाठी तिने जागा मिळविली.

एक दोन गड्याना घेऊन छपराला टेकू देण्याचे काम प्रथम तिने पार पाडले. खोरे घेऊन ती मातीचे ढीग टोपलीत भरू लागली. मातीने माखलेली व मातीत पुरलेली भांडी स्वच्छ केली. बसावयाचे पाट धुऊन काढले. मण्मय मूर्तींना स्नान घालून व देव्हाऱ्याचा पाट स्वच्छ करून देवाना स्थानापन्न केले.

कामासाठी पारे घालण्यासाठी गावभर फिरून एक मनुष्य मिळविला. त्याच्या साहाय्याने एकेक पारा घालून घेतला. माती तयार करण्याचे काम आईने सुनंदाच्या मदतीने केले. तोरसे गावात जाऊन व महादेव मेस्ताला बोलावून, घरातील फळ्यांचा उपयोग करून काम चलाऊ दरवाजे करून घेतले. वेळेवर जेवण नाही, झोप नाही, अशा परिस्थितीत बाहेरील भिंतीचे काम पूण होताच आई सुनंदासह घरात निर्भयपणे राहू लागली. माजघरात जमीन वगैरे स्वच्छ करावयाची होती. बिळे लिंपली, तरी दुसऱ्या दिवशी घुशी बिळे तयार करीत व प्रत्येक बिळाच्या तोंडावर मातीची रास करीत. त्या बिळांची भीती सुनंदाला वाटे. अशा वेळी आई झोपताना नेहमी म्हणे, 'कोणाक खाव्‌चा आस्‌लां तर माकां खाया... माझ्या सुनंदाक नको.' हा हा म्हणता उन्हाळा सुरू होण्यापूर्वी आईने घर पूर्वरूपाला आणले.

हिंमत, निर्भयता, निर्धार व परिश्रमाचे आह्वान कणखरपणे स्वीकारून ज्या घरात तिने जन्म घेतला ते घर पुन्हा उभे केले. 'माझी मठी मी पडांक् देवचंय नाय.' असे ती नेहमी म्हणे. कृतीने ते तिने सिद्ध केले. असलेल्या सामानाचा उपयोग करून घर उभे करणाऱ्या माझ्या आईला तिचे वडील हयात असताना पूर्वीपासूनच 'शांतु माझो झील आसा.' असे नेहमी म्हणत. मुलाप्रमाणे आपल्या आईवडिलांचे घर माझ्या आईने विश्वस्ताप्रमाणे सांभाळले. याबाबतीत तांबोसे गावातील अनेकांचे सहकार्य तिला लाभले.

●

आमचे आप्पा

१९६२ मध्ये २२ जुलाईला आजगावला आप्पा वारले. त्यांच्या बहिणी व धाकटे भाऊ त्याना 'बाबा' म्हणत. आम्ही दोन्ही भाऊ त्याना आप्पा म्हणत असू. आईच्या माहेरकडील सर्वजण व आजगाव सोडून इतरत्र ज्या ज्या ठिकाणी आमचे बिऱ्हाड थाटले गेले त्या त्या ठिकाणी त्याना 'आप्पा' याच नावाने हाक मारली जाई. उंचीच्या दृष्टीकोनातून आई उंच व आप्पा त्यामानाने ठेंगू होते. रंगाचा विचार करताही आई गव्हाळ रंगाची तर आप्पा कृष्णवर्णी होते. त्या दोघांच्या विचारात व आचारात सुद्धा जमीनअस्मानाचे अंतर होते. देवधर्म, उपासतापास, स्पृश्यास्पृश्यता वगैरे बाबतीत आई कर्मठ व कडक होती. तिच्या पाण्याला आमचा कुणाचाही हात लागलेला तिला पसंत नसे.

या उलट आप्पा होते. उपोषण त्यांच्यावर लादले गेले तर उपास न पेक्षा उपाहार त्याना अत्यंत प्रिय असे. सोवळे ओवळे याबाबत त्यांचे नियम शिथिल होते. गुरूचरित्राची पारायणे त्यानी केली होती. जन्म-वेळच्या कुंडलीतील ग्रहांप्रमाणे होणार असे त्यांचे म्हणणे. म्हणूनच त्यानी चार महिने नोकरी तर पाच महिने बेकारी अशा अवस्थेत राहावे लागत असे.

गोव्यातील दाभाळ येथे त्यानी प्राथमिक शाळा सुरू करून चालविली. त्या भागात ते शंकर मास्तर म्हणून ओळखले जात. सावर्डे येथे त्यानी रेल्वे स्टेशनजवळ हॉटेल सुरू केले. दरम्यानच्या काळात एक दिवस अशी परिस्थिती आली की घरात अन्नाचा कणही नव्हता. अशावेळी शेजारच्या गावात जाऊन भांड्यावर नावे घालून त्यानी पैसे जमविले व घरात धान्य आणले, ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करून जन्म पत्रिका व जन्म टिपणे करण्याचा धंदाही काही काळ त्यानी सुरू केला. त्यामुळे ज्योतिषी आजगावकर म्हणूनही ते काही ठिकाणी ओळखले जाऊ

लागले. त्यानी जवळ जवळ ३००० जन्मपत्रिका केल्या होत्या. पुण्याच्या त्रिकाळमध्ये त्यांचे आठवडयाचे भविष्य काही काळ छापून येत असे. असे मला पक्के आठवते. काही काळ त्यानी पेढीवर क्लार्क म्हणून काम केले. त्यानी पायी कित्येक मैल प्रवास केला. जरुरीची व आवश्यक वस्तू कितीही पैसे मोजावे लागले तरी ती ते घेत. याउलट अनावश्यक वस्तू मोफत मिळाली तरी ते घेत नसत. ' उशाक् शंभर रुपयांची नोट आसली तर माकां झोप बरी लागता.' असे ते म्हणत. १९५० मध्ये आजगावहून निघणाऱ्या ' प्रणाम ' पाक्षिकाचे ते संपादक होते. नित्य नियमित विकत घेऊन ते वर्तमानपत्र वाचीत व राजकारणावर चर्चा करीत. चहा व विडी या बाबतीत त्यानी तडजोड कधीच केली नाही विडीसाठी पैसे नसले तर वर्तमानपत्रांची रद्दी विकून मिळालेले पैसे ते विडयांसाठी वापरीत. गुंडूला त्याच्या अनुपस्थितीत ते धर्मराज म्हणत. त्यांच्या स्वभावात दारिद्र्यातही जे औदार्य होते व मुलांबद्दल जी सहानुभूती होती त्यामुळे आमचे आप्पा आम्हा दोघीही मुलांस अतिशय जवळचे वाटत. वयाच्या सत्तराव्या वर्षी ते हळूहळू थकत चालले. पचन-शक्ती कमी होऊ लागली. कफाचे प्राबल्य वाढले. आम्ही दोन्ही मुलगे जवळ होतो. आम्हा दोन्ही मुलांची लग्ने होऊन दोन दोन पुत्ररत्नेही झालेली होती. आपणास नातू झाले असून मुलांचा संसार चांगला चालला असल्याने ते समाधानी होते. मृत्यू सर्वांना असल्याने त्याची फिकीर त्याना केव्हाच वाटली नाही. मात्र देहास होणाऱ्या यातनानी मृत्यूपूर्वी ३–४ दिवस त्याना कष्टमय गेले. आजारपणात आप्पांच्या शेजारी मी व आई झोपत असू. खोली लहान असल्याने खोलीच्या बाहेर गुंडू व मामा झोपत असत. खोली उघडीच असे. आप्पांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी रात्री एक दोनच्या दरम्याने मला जाग आली. व पहातो तर आप्पांना वेदना होत होत्या. पण सहन करून आपल्या वेदनांवर ते ताबा ठेवत होते. आईला कित्येक दिवसांच्या जागरणाने झोप आली होती व तिचे डोके त्यांच्या गुडघ्यावर होते. ' माकां कळा येतत पण मी ओरडलंय तर तां उठतालां.' असे मला आप्पा म्हणाले. ते दृश्य व आप्पांचे विचार व भावना ऐकून मृत्यूबद्दलची त्यांची दृष्टी

कशी होती याची कल्पना आली. 'औषधोपचार व डॉक्टर यांच्यासाठी पैशाचे पाणी करू नका.' असेही त्यांनी सांगितले.

माझ्या आयुष्यात आईला आप्पाजवळ केव्हाच पाहिले नव्हते. आपल्या मुलांसमोर ही मनाने एकत्र असून देहानेही जवळ आलेल्या आईवडिलाना मी एकच वेळ त्यादिवशी पाहिले. दुसऱ्या दिवशी शनिवार होता. पुरुष मंडळीचे जेवण पूर्ण होऊन आम्ही बाहेर आलो. खोलीत जाऊन पहातो तर आप्पांची नजर बरोबर दिसेना. श्वासोच्छ्वासही मंद खोल वाटू लागला. ओठ वाकडे होऊ लागले. आप्पांचे प्राणोत्क्रमण आम्हा दोन्ही मुलांच्या मांडीवर झाले. आईला काही कल्पना नव्हती. त्यावेळी तिला कल्पनाही देणे अयोग्य होते. आप्पाच्या मृत्यूची गावात बातमी पसरल्याने लोक घरी येऊ लागले. आईने समोर काका मास्तरला व त्याच्या उजव्या खांद्यावर पंचा पाहताच 'काय झालां रे...... सगळे गप्प कित्याक ?' असे विचारले.

आप्पांच्या मृत्यूनंतर अठरा वर्षात शनिवारी एकदाही तिने अन्नाला स्पर्श केला नाही. आप्पांच्या मृत्यूनंतर आम्हा सर्वांवर दुःखाची छाया पसरल्यास नवल नाही. पण या दरम्यानच्या काळात अंबाजी नानांच्या बाईने आईच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडताना व बांगड्या दगडाने फोडताना ज्यावेळी मी पाहिले त्यावेळी दुःखाच्या हिमालयाचे कडे कोसळल्यासारखी परिस्थिती झाली. हिंदु धर्मातील मरणोत्तर सोपस्कारात सुधारणा व्हावयास हवी असे वाटणारा तो क्षण होता. आजगावच्या स्मशानभूमीत आप्पाना नेले. त्यावेळी ६०–७० बहुजन समाजातील शेतकरी कामकरी लोक हजर होते. बहुजनसमाजाशी त्यांचे संबंध अत्यंत जवळचे होते. 'चार दोन आणे बाबाकडे असले तर बाबान् नाय कधीच म्हणाक नाय.' असे त्यानी बोलून दाखविले.

गेली १५ वर्षे आईची आर्थिक सुस्थितीत गेली. तशीच वार्धक्यामुळे मधून मधून त्रासाचीही गेली. ताबोशाला गुंडूने इलेक्ट्रिक फिटींग करून घेतले व घरात विद्युत आल्याने प्रकाशच प्रकाश झाला व त्यामुळेच घरातील काळोखाचे वातावरण संपले व घरातील वस्तू पाहण्यात आईची होणारी गैरसोय कमी झाली. एकदा केव्हा तरी स्वीच वर खाली करताना आईला जरा शॉक लागला. मी गावी गेलो असताना

आई सहजच गमतीने म्हणाली की, 'माझ्या गुंडूनं माझी सोय बरी केली हा...... वर जावचा झाला तर पुटकन् जावक बरां.' असे म्हणून आपली शॉकची आठवण तिने मला सांगितली. 'गुंडूने रेडिओ आणल्यान म्हणून माका जाग बरी आसा,' आई म्हणे. एकटी असली की सकाळपासून रात्री ११ वाजेपर्यंत ती रेडिओ लावून ठेवीत असे व एखादे स्टेशन बंद झाले की दुसरे लावत असे. कोणतेही गाणे सुरू झाले की 'काय लता गाता! आवाज बरोऽऽ आसा... पोराक भरपूर आयुष्य मिळाक होयां... कोणाचां रे चेडू तां... सद्गुरू ?' म्हणूक मला केव्हा केव्हा विचारी. 'गुंडूने माझी सोय बरी करून दिली हा.' असे म्हणून गुंडूची ती वारंवार आठवण काढत असे. 'माझ्या गुंडूने घराक दरवाजे लावले. पायऱ्या शिमिटाच्यो केल्यो... मोऱ्येक शिमिट काढून घेतल्यान्... आवशीक त्रास होऊ नये म्हणून काय काय करताऽऽऽ! 'तू मेल्या सोल्जर! तुझो लक्ष सरकारच्या कामावर.', 'ये... पेज घे आणि मग माच्यार (पलंगावर) पड.' असेही म्हणत असे.

●

आईची दिनचर्या

आई सकाळी ३ वाजता अगर त्यापूर्वी उठे. चूळ भरून मोरीत टाकी. ओटा, देवखोली, रानाभोवरा, वानशी, (वास्तव पुरुषाचा घराचा मध्यभाग व इतर भाग) केरसुणीने स्वच्छ करी. नंतर चुलीचा भाग रेव्याने पुसून काढी. नंतर पुढल्या दाराच्या घराच्या पायऱ्या स्वच्छ पाण्याने धूऊन काढत असे. अखेरचे स्वच्छतेचे काम म्हणजे अंगण व विहिरीकडे जाणारी पायवाट स्वच्छ करण्याचे, देवखोलीचा काही भाग शेणाने ती नेहमी सारवी. देव खोलीत व सडासंमार्जन केलेल्या इतर भागात– विशेषतः पुढल्या दारी रांगोळीने कमळाच्या पाकळ्या काढत असे. देवखोलीत स्वस्तिक चिन्ह काढत असे. तुळशीकडे केव्हा केव्हा रांगोळी घालत असे. देवाची भांडी माडाच्या मुळात वेगळ्या गवताने व राखेने घासत असे. तोपर्यंत सोडणे व पतारा (झाडाची सुकलेली पाने) न्हाणीच्या चुलीत घालत असे व पाणी गरम होऊन

रहात असे. नंतर तंबाखूची मशेरी करत असे व मी घरी असलो तर त्यातील थोडी माझ्यासाठी एका पुडीत भरून ठेवीत असे. मशेरी लावून झाली की आई तांब्या घेऊन बागात जावयाची व शौचाहून आल्यानंतर बाहेरच्या बाहेर तापलेले पाणी घेऊन स्नान करावयाची गुरुवार, शनिवार व इतर एकादशीसारख्या अगर संकष्टीसारख्या दिवशी सोवळे नेसावयाची. इतके होईपर्यंत सकाळी ८ वाजावयाचे. जे लोक बाकावर, माच्यावर व इतर ठिकाणी झोपलेले असतील त्याना न उठविता हे सर्व व्यवहार होत असत. आमचे झोपणे तिच्या पथ्यावर पडे. कारण आम्ही लवकर उठू तर चहा व इतर खाण्यासाठी कुरकुर करणार याची तिला चांगली कल्पना असल्याने जर कोणाला उठविण्याची वेळ आली तर आई म्हणे, 'झोपले तेका सुक्षमपणे झोपां दे.' एवढे झाल्यावर चुलीमध्ये अग्निनारायणाचे दर्शन होई. विस्तवासाठी माडाच्या पोया, पिडे, सोडणे, चुडत्या व कमी प्रमाणावर लाकडे यांचा उपयोग आई करीत असे. पहिले काम म्हणजे चहाचे. चहाला चांगली उकळी फुटली की आठ–साडेआठच्या दरम्यान 'उठा रे ऽऽऽ अधिक झोपां नकात. दिवस माथ्यावर इलो.' सदरची घोषणा ऐकू आल्यानंतर आमच्यासारखे चहाभक्त उठत असत.

आम्हा दोघांचे विवाह झाल्यानंतर आमच्यापूर्वी उठण्यासाठी आईला दोन जादा माणसे हल्ली सुट्टीत मिळत असत. शक्य तो केवळ चहावर आम्हास न भागविता सोबत भाकरी, आंबोळी अगर घावणा इत्यादी खाद्य पदार्थ आई समोर ठवत असे. हा चहा व हे खाणे वगैरे कार्यक्रम पार पाडण्यास कुटुंबातील सभासद (मुलगे, नातू वगैरे) जसजसे उठत तसतसा वेळ लागत असे व यात किमान १० ते १०॥ वाजत. 'कपाळावर तॅल घाला. न्हावा आणि पूजा करणारे पूजा करा.' असे ती फर्मावत असे. तेवढ्यात चुलीवर पेजेसाठी आधण ठेवले जाई. यापूर्वी सांगितलेली अगर अन्य कसलीही भाजी होत असे. सर्व सभासदांचे स्नान व देवपूजा होईपर्यंत आईच्या स्वयंपाक घरात पेज व भाजी व्हायची. म्हणेपर्यंत १२ ते १२॥ वाजत. त्याच प्रमाणात भात जेवण्याचा कार्यक्रम २॥ ते ३ पर्यंत पार पडत असे. ३ ते ३॥ पर्यंत जेवायला मिळाले तर दोन्ही सूनबाईंना किती लौकर जेवलो याचा आनंद होई.

दुपारचे जेवण झाले की फुलझाडाना; तुळशीला, केळीना पाणी घालण्यासाठी विहिरीवर आई जात असे. पुढील दरवाज्याजवळ उजवीकडे असलेल्या जमिनीच्या उंचवटयावर हळद लावण्यासाठी जमीन कुदळीने खणत असे. तर कधीकधी बागातील पतारा एकत्र करून त्याचे वेगवेगळे ढीग करत असे. या पताऱ्याचा उपयोग ती स्नानासाठी लागणारे आंघोळीचे पाणी गरम करण्यासाठी व माडांची खणणावळ करून घेऊन त्या माडाना ती राख खत म्हणून घालून घेत असे. रात्रीचा भात राहिला तर तो पेजेच्या निवळात घालून गुरांच्या मुखाला लावी. व गुरांचे हवे असलेले शेण हक्काने शेजारच्या गोठयातून घेऊन येई. मोरीतले पाणी फुकट जाऊ नये म्हणून किचन गार्डन तिने केली होती. केळीची झाडे लावली होती. पाणी मोफत जाता नये असा तिचा कटाक्ष होता. जेवल्यानंतर आमच्यापैकी काहीजण तोंड धुण्यासाठी बाहेर येऊ लागलो की आई घरातून मोठयाने सांगे, 'आचुवताना झाडापेडाखाली आचवा रे.' तहानलेल्या वनस्पतीला पाण्याचा एक थेंबसुद्धा जरुरीचा असतो. म्हणून कुठेतरी पाणी टाकू नये असे तिचे म्हणणे.

भिरंडाच्या दिवसात भिरंडे फोडण्याचे काम ती करीत असे. बेंडयाच्या दिवसात बेंडे सुपारी सोलण्याचे काम ती करीत असे. फणसांच्या दिवसात रसाळ गऱ्यांच्या मधाची साटे घालण्याचे व ती सुकविण्याचे काम करत असे. केव्हा केव्हा करांदा, मिरवेल, चिन्याचा वेल यांना आधार देण्यासाठी बांबू पुरण्याचे काम करत असे. काहीच काम नसेल तर देवासाठी लागणाऱ्या वाती तयार करण्याचे काम करी. पण दुपारनंतरचा वेळ झोपण्यात कधीच तिने घालविला नाही. गप्पा गोष्टी करण्यासाठी शेजाऱ्यांकडे ती केव्हाच गेली नाही व आपल्या घरीही चार चौघांना घेऊन नुसत्या गप्पा किंवा इकडचे तिकडचे चाळे कधीच केले नाहीत.

तिला ताप येवो अगर डोके दुखो, तिने स्नान केव्हाच टाकले नाही. 'अरे! न्हाणा म्हणजे अर्धा जेवण आसा.' असे ती म्हणे. वटपौर्णिमेचे तीन दिवसांचे उपोषण म्हणजे अती खडतर उपोषण असे. पावसाळयात म्हातारपणात विहिरीचे थंड पाणी स्नानासाठी वापरणे म्हणजे महाकर्म कठीण. पण ते स्नान ती मोठया उत्साहाने करी. अंगात ताप असला

अगर थंडी झालेली असली तरीही तिने याबाबतीत तडजोड केलेली नाही. चुलीवर उष्णता दिलेला कोणताही पदार्थ (चहासुद्धा) या तीन दिवसात ती घेत नसे. आंबे, गरे खाऊन अगर थंड पाणी पिऊन ती रहात असे. या तीन दिवसांचे उपोषणाला मागे गुरुवारसारखा दिवस जोडून आला की चार दिवस उपोषण होई.

या उपोषणाचा कालावधी पार पडला की, नंतर केव्हा केव्हा एन्फ्लुएन्झा अगर त्याच स्वरूपात मोठा आजार तिला हटकून यायचा. ताप गंभीर स्वरूपाला पोहोचेपर्यंत स्नान करण्याचे काम तिचे अव्याहत चाले व चालणे बोलणे अशक्य झाले तर लोटचावर दाणशीत अगर राना भोवऱ्यात भिंतीला टेकून राही. आमच्यापैकी जर कोणी घरात नसला तर शेजाऱ्यांकडून सावंतवाडीस निरोप येत असे. अगर मुंबईला पत्र जात असे. लगेच असेल त्या परिस्थितीत मी अगर भाऊ निघत असे व वैद्यकीय उपचार सुरू करून आईची गाडी पूर्ववत चालू होई. बांद्याहून अनेकवेळा डॉ. खानोलकर आईच्या आजारात येत. आई त्याना सांगे, ' माझां सगळां बरां आसा. इंजेक्शन सोडून बाकी काय तां देवा.' डॉक्टर ते ऐकत पण जर केव्हा इंजेक्शनशिवाय भागणारे काम नसले तर व आई अत्यवस्थ असली तर मग ते इंजेक्शन देत. मग आई जरा ध्यानावर आली की म्हणे, ' खानोलकरांच्या हाताक् गुण बरोऽऽऽ आसा ' आईची वटपौर्णिमा जवळ येऊ लागली की, त्यापुढे माझी १५ दिवसांची हक्काची रजा असे. समीकरण पुढे पुढे होऊ लागले

आई तांबोसे येथे असताना मी कुणाही मनुष्यास सामान देऊन पाठविले अगर कोणताही निरोप देऊन पाठविले अगर जवळपासून दूरपर्यंतच्या नात्यातला कोणी मनुष्य तेथे गेला तर आई त्याला रिक्त हस्ताने केव्हाच परत पाठवीत नसे. केव्हा फणसपोळी तर केव्हा पिकलेल्या फणसाचे सुकलेले गरे, नारळ किंवा पिकलेले थोडे बेंडे अगर सुपाऱ्या देत असे. कुणालाही रिकामे पाठविणे तिला योग्य वाटत नसे. लहान मुलांच्या खिशात रुपयाचे अगर अधेलीचे नाणे घालत असे व त्या वयातील मुलाना ते छोटे नाणेही फार वाटे. ' शाळेची चोपडी घे नाय तर अंकलिपी घे.' अशीही पुस्ती लहान मुलांच्या बाबतीत आई जोडी. जत्रा आली की घरातील तसेच शेजारच्या सर्व मुलाना आत्या-

कडून चवलीपावली ठरलेली मिळेच. जत्रेतील दशावतार नाटक पाहाण्यासाठी गेलेल्या सर्व मुलांचे व मोठ्यांचे कपडे पहाटे घरी आल्या-नंतर बाहेर काढून ठेवावे लागत व नंतर स्नान करून घरात प्रवेश मिळे. याबाबतीत कुणालाही सवलत नव्हती. हे दशावतार नाटक आरंभापासून पहाटेपर्यंत आई पाहत असे. तिचा हा क्रम कित्येक वर्षेपर्यंत चालू होता. येताना तीं खाजे आणत असे. आपल्या नातेवाई-काना (जवळच्या व दूरच्या) परगावी कुणाकडे ना कुणाकडे पाठवीत असे. तसेच त्या आठ दिवसात जो जो कोणी घरी येई त्याच्या हातावर खाज्याची कांडी ठेवीत असे.

•

आईचा आजार

१९६८ ची गोष्ट. मडुरे शाळेत मी व सौ. विद्या शिक्षक म्हणून काम करीत होतो. सायंकाळचे चार वाजले असतील नसतील एवढ्यात तांबोसे गावच्या हद्दीवरील (उगवे गावचा) पालेकर नावाचा माझा मित्र मडुरे येथे सायकलवरून आला. माझ्या वर्गाच्या खोलीतून मला पालेकर दिसताच मी बाहेर आलो. प्रथम आईची चौकशी केली. तांबोसे गावचा कुणीही मनुष्य बिऱ्हाडी दिसला की, 'आई आजारी झाली नसेल ना ?' असे विचार माझ्या मनात का कुणास ठाऊक पण उगाच येऊन जात. बऱ्याच वेळा ही शंका चुकीची ठरे. पण आज मात्र पालेकर म्हणाले, 'तसां बरां आसा, पण आई पडल्यामुळे हात दुखावलो हा' पालेकरानी हे सांगताच मी मुख्याध्यापक आरोंदेकर यास आईच्या आजाराची कल्पना दिली व कोणत्याही परिस्थितीत तांबोसे येथं मला गेले पाहिजे असे सांगितले. सौ. विद्याला सुद्धा पालेकरांकडून हे समजताच तीही 'मी येणार' असे म्हणाली. चि. पपू व चि संजीव हे दोघेही आम्ही जाऊ तेथे आमच्याबरोबरच असत. अर्थात आम्ही दोघे, आमची दोन मुले व श्री. पालेकर असे पाचहीजण मडुरे येथील बिऱ्हाडी गेलो. हवे असलेले कपडे व इतर सामान घेतले व मधल्या वाटेने सातोसे

येथील नदीवर येऊन पोहोचलो. ऐल तडीवर सातोसे व पैल तडीवर तांबोसे. होडीत बसून पैल तडीवरील तांबोसे हद्दीत येऊन पोहोचलो. येथून चार फर्लांगावर आमचे आजोळचे तांबोशाचे घर होते. चाल जरा वाढविण्याचा प्रयत्न केला. तरीवरून घरापर्यंतची वाट मधल्या बागायतीतून आलेली असल्याने व मध्ये दोन आडचा (लहान वहाळा-वरील ओलांडण्यास अडचणीचे असल्याने विलंब लागणे स्वाभाविक होते. इतके होईपर्यंत व आजोळच्या घरच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचेपर्यंत दिवे लागणीची वेळ झाली. वानशीत भाताच्या मुडीला टेकून बसलेल्या व असह्य वेदनांनी व्याकुळ होऊन पुढील दरवाज्याच्या दिशेने माझ्या वाटेकडे लक्ष ठेवून असलेल्या आईची नजर माझ्या नजरेस लागल्याबरोबर आईचे अश्रू हसू लागले.

माझ्याबरोबर संजीव होता. त्याने आईचा हात पाहून आक्रोश केला. आजीला जाऊन मिठी मारण्यापूर्वीच त्याला मी तिच्यापासून वेगळे केले. आईचा डावा हात हत्तीचा पाय झाला होता. दुपारी ती शेजारच्या बापूच्या झिलाच्या घरासमोरील खळ्यात बेड्यावरून घसरून पडली होती. खांद्यापासून खाली मध्यावर तिच्या हाडाला फ्रॅक्चर झाले असल्याने व ती डाव्या कुशीवर पडून तिची कंबरही दुखावल्याने ती तशीच पडून तेथे काही मिनिटे होती. समोर पडवीत असलेल्या बापूच्या झिलाला (हा तिचा चुलत भाऊ. केव्हा केव्हा घरी बोलावून आणून आई त्याला सणासुदीच्या दिवशीच्या पोळ्या अगर अन्य आवडीची वस्तू खावयास देत असे.) तिने खुणेने बोलावण्याचा प्रयत्न केला. ज्या वेळी तेथेच उभा राहून तो हासू लागला, त्यावेळी आईने वेदना असह्य होऊन तोच उजवा हात आपल्या कपाळावर एकदोनदा मारून घेतला. त्यावर ' मुलां आसतांना कपाळावर हात मारून घेव् नको.' असे बापूचा झिला म्हणाला.

इतके होईपर्यंत रामकृष्णाची पत्नी व शेजारची भावीण सत्यभामा धाऊन आली व त्यानी आईला उचलून घरात आणून ठेवले. मी घरी येऊन पोहोचताच बापूचा झील घरी आला व आईला झालेल्या गंभीर दुखापतीची आपणाला कल्पना आली नाही असे म्हणाला. या बापूच्या झिलाला गावातील लोक 'भेरो ताता' असे म्हणत. त्याला श्रवण

दोष होता ही गोष्ट खरी. त्या दिवशी संकष्टी होती. देवाकडे दिवा पेटत ठेवण्याबद्दल शेजारच्या गजाला आईने सांगितले होते. सौ. विद्येने लगेच पाणी गरम करून आंघोळ केली. मुकटा नेसली व आईच्या सूचनेप्रमाणे गणपतीचा नैवेद्य करण्याच्या दृष्टीने राना भोवऱ्यात तिने चूल पेटविली. आईला असह्य वेदना होत होत्या. अशा परिस्थितीत तिने स्नान करू नये म्हणून आम्ही सर्वांचे मत, पण हे मत बोलून दाखवायचे कोणी ? बाकी कुणालाच धीर होईना म्हणून मी सहजच पुटपुटलो. ' आई पूजा मी करतंय, तुका न्हाण्याचां कायच कारण नाय.' हाऽऽऽ हायऽऽऽ म्हणत असत.नाच आई म्हणाली, ' झिलां ! असला कायतरी बोला नको ठसठशीत गरम पाणी कर. थोडा डाव्या हातार घाल आणि बाकी, रव्लेला कपाळार घाल. आयतो हात शेकतलो आणि माझा न्हाणाय होतालो.' आईने आपल्या निर्णयात बदल केला नसल्याने आमचाही नाइलाज झाला. रात्रौ ९–९। झाले. मी स्नान करून पूजेला बसलो. माझी पूजा म्हणजे ' रामरक्षा पूजा.' सुरुवातीपासून रामरक्षा म्हणत गणपतीच्या मूर्तीला स्नान घालून अक्षता वगैरे टाकून (त्यात दुर्वाही) पूजा केली.

' सुखकर्ता दु:खहर्ता ' आरती म्हणून व ' घालीन लोटांगण वंदीन चरण ' म्हणून काम पूर्ण झाल्यानंतर आरती खाली ठेवली. तेवढ्यात आई म्हणाली, ' सद्‌गुरु, झिला माकां जरा पुढच्या दाराच्या हुंबऱ्यावर नेव्न बसव. चंद्र बघूचो आसा.' मी प्रथम आरती (निरांजनासहित) तुळशीसमोर नेऊन ठेवली व आईला नेऊन पुढील दाराच्या पायरीवर नेऊन बसविले. तेथे नेईपर्यंत आईला होणाऱ्या वेदना इतक्या तीव्र होत्या की वेदनादर्शक चेहऱ्याने चारही दिशाना सुरकुत्यांचे जाळेच निर्माण केलेले दिसले. ' आई, तो बघ चंद्र पूर्वेकडच्या डोंगराच्या माथ्यावर इलो हा.' आईनेही चंद्राला नमस्कार करून ' गणपती बाप्पा, तुका जर माझ्या हातचो निवेद नको होतो तर एकच हात कित्याक मोडून ठेवलंय ? दोनय मोडून टाकूक तुझे कोणी हात धरलेले रे ?' असे म्हणून चंद्राच्या दिशेने उजव्या हाताने फूल फेकले व म्हणाली, ' सद्‌गुरु आता माका घरात घेव्न चल.'

आईला घरात आणून ठेवले. आम्ही जेवावयास बसलो. आईला नैवेद्याचे पान ठेवलेले. आईच्या हाताच्या वेदनांनी तिला अस्वस्थ करून सोडले होते. एक घास तिने तोंडाला लावला व पान पुढे सरकवून ठेवले. बस्सऽऽऽ पुरे, असे म्हणून तिच्या समोर केलेल्या भांड्यात तिने चूळ खळखळून टाकली. म्हणेपर्यंत ११ वाजले व आईच्या वेदनानी एवढा जोर केला की, अक्षरशः ती मोठ्यामोठ्याने किंकाळ्या मारू लागली. अमृतांजन, स्लोन्स लीनीमेंट व इतर उपचार करण्यापलीकडे त्या खेडेगावात काहीच नव्हते. रात्री बांद्याला जावयाचे तर आई मला पाठवीना. हाड मोडल्यानंतर होणाऱ्या वेदना किती भयंकर असह्य होतात. याची कल्पना ज्याच्या त्यालाच येतील. रक्ताभिसरणाच्या क्रियेबरोबर त्या त्या वेळी त्या वेदनांची कळ आईला मोठमोठ्याने किंकाळी मारावयास लावी. गावच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आरपार काळोख भेदीत जाणाऱ्या त्या किंकाळ्यानी सर्वांनी रात्र जागून काढली. त्यातूनच तिचा हात विशिष्ट पातळीत माझ्या हातात घेऊन राहिल्यास कळा कमी होतात हा अनुभव आल्याने त्या पातळीत तिचा हात घेऊन मी व सौ. विद्या दोघानीही पहिले २०–२५ दिवस आम्ही आळीपाळीने घालविले. आईने हॉस्पिटलमध्ये जावयाची तयारी दाखविली असती तर आम्हाला अशा प्रकारचा त्रास करावा लागला नसता. पण आईचे हॉस्पिटलबाबतचे मत अतिशय वेगळेच होते. ' लौकर मारूचां आसलां तर हॉस्पिटलात घाला म्हणजे तुम्ही सुटल्यात एकदा.' असे ती केव्हा केव्हा म्हणे.

आईच्या आजाराच्या बाबतीत मी मुंबईस गुंडूस सविस्तर पत्र पाठविले. लगेच गुंडू आला. त्याला पाहताच आईने मला बोलावून घेतले व म्हणाली, ' हो माका हास्पिटलात व्हरतलो. तू तेकां चक्क सांग, हास्पिटलात आई जाव्ची नाय म्हणान.' गुंडूला त्याप्रमाणे मी सूचित करताच गोव्याचे हाडाचे वैद्य उपलब्ध होतात अगर कसे हे पाहण्यासाठी पणजी, कुडाळ वगैरे भागात तो गेला. गेले आठ दिवस शेक देणे–वेखंड, तुरटी वगैरेचा तेलातील लेप लावणे व इतर कुणी जे जे सांगतील ते ते मी करू लागलो. डॉक्टरानी सांगितल्याप्रमाणे पोटातील गोळ्या सुरू होत्या. आईचा हात जाडजूड होऊन काळा

ठिक्कर पडला होता. मात्र पूर्वीप्रमाणे होणाऱ्या मरणप्राय वेदना जरा कमी झाल्या होत्या. पहिले ६–७ दिवस आईने अन्नग्रहण काय किंवा इतर खाणे बंदच ठेवले होते. मागाहून कारण विचारताच ती म्हणाली, ' अरे– परस्वाधीन माणसान् अन्न खाव् नये... खाल्लालां पचाक कठीण आणि पच्लल्याचो पुढे निग्रम लाव्क कठीण.'

गुं. फ. ज्या दिवशी पणजीला गेला त्याच दिवशी बांदे येथील एक नवीन डॉक्टरला आईचा हात दाखविण्यासाठी आणले होते. त्यानी हात पाहिला व मला बाजूला नेऊन सांगितले की, तिचा हात ऑपरेशन करून काढून टाकावा लागेल. दुसऱ्या दिवशी सकाळी गुंडू आला व माझ्या हातात वनस्पतीची काही मुळे व बँडेज देऊन म्हणाला की, या पाळाचे लेप थंड पाण्यात उगाळून तीन दिवस लावला व वर पट्टीचे बँडेज बांधले की तीन दिवसात सर्व सूज झरझर कमी होईल. म्हापसे येथील हाडवैद्याने प्रतिज्ञेवर तसे सांगितल्याचे त्याने सांगितले.

गरम पाण्याच्या शेकाने आईला बरे वाटत असे. थंड पाण्यातून वनस्पतीचे पाळ उगाळून लावण्यात तिला धोका वाटत होता. पण आम्ही सर्वांनी तिची समजून घालताच ती तयार झाली. तिच्या खांद्या-पासून मनगटापर्यंत पांढरा शुभ्र लेप लावला व त्यावर मळसूत्राच्या फेऱ्यांप्रमाणे बँडेजची पट्टी फिरवून बांधली. चमत्कार असा की तीन चार तासात सूज कमी होत असल्याच्या निदर्शक सुरकुत्या तिच्या हातावर दिसू लागल्या. चार दिवसातील या प्रयोगाने हाताची सूज एकदम कमी झालेली आढळली. डाव्या कुशीची सूजही त्या लेपाने कमी झालेली आढळली. या आजारात पोटात (टेंडरिल) च्या गोळ्या सुरू होत्या. आईचे फिरणे कमी झाल्याने पायावर थोडी सूज दिसली की लघवी व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने (लॅसीस) ची अर्धी गोळी मी देत असे. तसे केले की लघवी चांगली होऊन तिची सूजही कमी होत असे.

गुंडूला तांबोसे येथे अधिक राहणे शक्य नव्हते. मी आईजवळ असलो किंवा वडिलांजवळ असलो तर प्रत्यक्ष जवळ राहून सेवेची संधी स्वतः न घेता मलाच अग्रहक्क तो देत असे. आईही म्हणे ' अरे, माझो गुंडू अलकुळो आसा. तेकां ह्यां काम जमाचां नाय. कोणय मरत असलो तर तुझ्यासारखो सोल्जर बरो. मी जर मरांक लागान तर तो आरड

मारतलो आणि माझ्या आधी तेचो प्राण जातलो. असली माणसां लांब असलेली झिला बरी...... समाजाला ? तेचां काम झालां. तेका आता जाऊ दे.'

लहानपणापासून एका गावाहून दुसऱ्या गावी मी, आप्पा (वडील) आई व गुंडू चालत जाऊ लागलो की असलेले ओझे आई आपणाकडे घेई व उरलेले माझ्या डोकीवर ठेवीत असे. माझी प्रकृती गुंडूपेक्षा जरा उजवी असल्याने आई असे करीत असे. लहानपणात शारीरिक ओझे न घेणाऱ्या गुंडूला पुढील आयुष्यात आर्थिक ओझे घ्यावे लागले व त्यानेही बिनतक्रार ती जबाबदारी पार पाडली. आईने लहानपणी गुंडूकडे न देता माझ्या डोकीवर ठेवलेली ओझी इतकी माझ्या अंगवळणी पडली की अजूनही गुंडूकडे कसलेही ओझे एखादी बॅग. अगर साधी पुडी असली तर चटकन् माझे हात पुढे होतात व ती वस्तू स्वाभाविकपणे घेतात. १०–१२ दिवसानंतर गुंडू मुंबईस जाण्यास निघाला व जाताना मला म्हणाला, 'आई असेपर्यंत आम्हाला एक आधार आहे, तिच्या पश्चात आम्ही निराधार होणार. कमी जास्त झाल्यास कळव.' गुंडू गेल्यानंतर मला व सौ. विद्याला तीन चार महिने तांबोसे येथे रजेवर आईच्या शुश्रूषेसाठी राहावे लागले. या सेवेचे फळ म्हणूनच की काय त्या दरम्यानच मी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावरून मला रत्नागिरी येथे मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले व मे १९६८ च्या पाच तारखेस वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कणकवलीच्या पंचायत समिती कार्यालयात माझी नेमणूक झाली. सौ. विद्याला मी तांबोसे येथेच ठेवले व मी कणकवली येथे हजर होण्यासाठी गेलो. आईच्या आशीर्वादानेच हे सर्व घडले.

●

मुंबईस प्रयाण

१९६८ च्या आजाराने आई पाठीतून थोडी वाकली. तिला थकवा वाटू लागला. त्या वेळी ती ६९-७० वर्षांची होती. असे असले तरी घरातील सर्व कामे तीच करीत असे. नोकरीनिमित्त मी महिन्यातून १५-२० दिवस फिरतीवर तर बाकी दिवस ऑफिसमध्ये काम करीत असे. सौ. विद्या शिक्षिका असल्याने तीही आपल्या कामावर असे शनिवार, रविवार अगर इतर सुटीत आम्ही आईकडे जात असू. आईच्या आजारातली कोणत्या परिस्थितीत मी व सौ. विद्या जात असू. अतिशय महत्त्वाची सरकारी कामे असली तर त्या मुदतीत मुंबईहून गुंडू येत असे. अशाच एका भेटीत १९७५ मध्ये त्याच्याबरोबर आई मुंबईस गेली. तांबोसे येथे तिने एकटयाने राहणे योग्य नव्हे असे त्याला वाटले. दोघांपैकी कुणाकडेही तिने राहावे असे त्याचे म्हणणे. गुन्डूची मुंबईला स्वतंत्र जागा होती. खास गाडी करून त्याने आईला मुम्बईस नेले. सोबत माझा धाकटा मुलगा संजीव होता. गुन्डूची स्वतंत्र जागा बघून आईला फार समाधान झाले. १९२४ पूर्वी आई मुम्बईला मांगलवाडीतील दारूवाला बिल्डिंगमधील एका खोलीत होती. पन्नास वर्षानंतर त्याच मुम्बईत मुलाच्या स्वतःच्या मालकीच्या जागेत प्रवेश करताना तिला अतिशय आनंद झालेला होता. तीन चार महिने ती तिथे राहिली. दरम्यानच्या मुदतीत एक दिवस ती अत्यवस्थ झाल्याने मुम्बईहून मला फोन आला. त्याच दिवशी मी सावंतवाडीहून मुम्बईला निघालो. माझ्या जाण्यामुळे तिला बरे वाटले. दोन तीन दिवसानंतर तिला घेऊन मी गावी निघालो. येतानाही तिचा अशक्तपणा लक्षात घेऊन खास गाडीतून तिला आणावे लागले.

गुन्डूच्या आग्रहास्तव आई मुम्बईस गेली असली तरी तिचे सर्व लक्ष तांबोसे येथील जन्मभूमीवर होते. 'झिला, मुम्बईक तुमचो ब्लॉक बरो, पण मोकळेपणा वाटणा नाय.' असे ती मला म्हणत होती. तांबोसे येथील तिची

कामे पूर्ववृत चालू झाली. मधून मधून तिला ताप येत असे. केव्हा केव्हा तिला दम्याचा त्रास होई. अतिशय थकवा आला की ती लाकडी माच्यावर झोपे व जरा बरे वाटले की ती काम सुरू करत असे. ७८–७९ वर्षे वयापर्यंत तिने आपल्या देहाला विश्रांती म्हणून दिली नाही. असे होता होता कुशीतून वेदना सुरू होऊन छातीत वात चढू लागला. अशा परिस्थितीत तिला तांबोसे गावात राहू देणे योग्य नव्हते, आईला तांबोसे सोडवत नव्हते. तेथे तिचे स्वातंत्र्य होते. दुसरीकडे जाऊन तिच्या स्वातंत्र्याचा संकोच होणार होता. ' माका हॉस्पिटलात घालता नये. तर मी येतंय.' असे ती म्हणाली. तसे तिला आश्वासन देऊन तिला सावंतवाडीस आणली व तिच्या ताब्यात आमच्या बिऱ्हाडाची जागा दिली.

सावंतवाडीत आमचे डॉक्टर म्हणजे श्रीपाद कशाळीकर होते. त्यांची ट्रीटमेंट सुरू होताच आईला आराम वाटू लागला. प्रथम स्पास्मो प्रॅक्झीव्हॉन गोळ्या सुरू करून नंतर साध्या प्रॅक्झीव्हॉन गोळ्या चालू केल्या. नंतर इतर वैद्यकीय उपचार चालू केले. वृद्धापकालातील आजारपणाचे वैशिष्टय असे की, आजाराच्या एका लक्षणाला उतार पडला कीं दुसरे लक्षण दिसू लागते. रक्त कमी म्हणून उपचार सुरू केला तर पायातून वात चढू लागे. त्यावर औषधोपचार सुरू केले तर दमा सुरू होई. सुक्या ओकाऱ्या बंद होण्याचे औषध घेतले की आई अतिशय बेचैन होई.

बऱ्याच वेळा मला रजेवर रहावे लागे. रात्रौ ८–९ वेळा उठावे लागे. सकाळी काम व रात्री जागरण असा नित्यक्रम सुरू होता. आईच्या आजारात मात्र केलेल्या जागरणाचा त्रास मला कधीच जाणवला नाही. या आजारात मला सौ. विद्याचा व दोन्ही मुलांचा फार उपयोग झाला. आईला सावतवाडीला आणून १५–१६ महिने झाले असतील, आपल्या दोन्ही धाकटया नातवांची मुंज व्हावी म्हणून तिने आग्रह धरला. तिच्या इच्छेप्रमाणे मुम्बईहून गुंडू व त्याची मंडळी आली. दोन्ही नातवांची मुंज तिने आपल्या अखेरच्या प्रवासापूर्वी करून घेतली. आठ दिवस राहून गुन्डू मुम्बईस गेला. आता तिच्या दोन्ही पायाना सूज आली होती. मात्र तिचे दैनिक स्नान (गरम पाणी) सुरू

होते. स्नानाशिवाय ती राहातच नसे. मी एक महिन्याची रजा मंजूर करून घेतली. तत्पूर्वी सेवानिवृत्त करण्याचा विनंतीअर्ज खात्याकडे रवाना केलेला होता. आईकडे सतत राहण्यासाठी मी आता मोकळा होतो. नामस्मरण, पारमार्थिक वाचन वगैरे उपक्रम सुरू होते. वैद्यकीय उपचारही सुरू होते. कोणतीच कमतरता नव्हती. मानसिकदृष्ट्या आई समाधानी जीवन जगत होती.

•

निरोप

' सद्गुरू ! आज देव इले. मी जातंय ' आई म्हणाली. काल संकष्टी होती. संकष्टीची पूजा सौ. विद्याला तिने सांगितली होती. आज सकाळी उठल्यावर सकाळी तिने मशेरी लावली. समोर धरलेल्या भांड्यात चूळ भरून तिने तोंड खळखळून पाणी टाकले. शौचाचा विधी नेहमी-प्रमाणे तिला तस्तात आटोपावा लागला. दोन्ही पायाना व पोटाला सूज होती. सहन होईल इतक्या गरम पाण्याने तिला आंघोळ घातली. लुगडे नेसण्यास मदत केली. केस स्वच्छ पुसले व पडवीतल्या खुर्चीत बसविले. ९–९॥ वाजता आंघोळ झाल्यावर २–२॥ तास ती खुर्चीवर बसून रहात असे. आज मात्र थोडा वेळ बसून खोलीतील पलंगावर ती बसण्यासाठी गेली. ' सद्गुरू, आज मी जातंय. तू रडां नको हां ! ' आई पुन्हा म्हणाली.

सकाळीच सौ. विद्याला व मामाना तिने तांबोसे येथे शिमग्याचे नैवेद्य करण्यासाठी पाठविले होते. कमळामावशीची मुलगी आका आईला पाहण्यासाठी मुद्दाम आली होती. तिने कणेरी केली होती ती जरा जाड झाली असल्याने आईला घेता आली नाही. खुणेने तिने मला बोलाविले. कणेरी जरा पातळ करून आणण्याबद्दल तिने मला सुचविले. त्याप्रमाणे करून मी आणल्यानंतर थोडीशी कणेरीं तिने घेतली व बाकी तशीच ठेवली. मधूनमधून आज ती थोडीशी गुंगीत जात असल्याचे आढळून आले. दुपारी ४–४॥ ला ' सद्गुरू डॉक्टराक बोलाव हा ऽऽ ' असे आईने

म्हणताच मी डॉ. कशाळीकर यांच्या घरी गेलो. ते झोपले असल्याचे त्यांच्या पत्नीने मला सांगितले. त्याना आमच्या घरी येण्याबद्दल सांगा. आईचे जरा जास्त असल्याचे मी त्यांच्या पत्नीला सांगितले. लगेच मी घरी आलो. कफमिश्रित सर्दी व अधूनमधून गुंगी यामध्ये आई होती. डॉक्टर आले. आईने त्याना अपेक्षित प्रतिसाद दिला नाही.

डॉ. कशाळीकरांचा चेहरा तटस्थ राहिला. वास्तविक डॉ. कशाळी-करांबरोबर आई काही ना काही प्रकृतीबाबत बोलायची. आज तिने तसे केले नाही. तिने त्याना ओळखलेही नसेल. कदाचित बोलणेही तिला अशक्य झाले असेल. 'डॉक्टर, आईचे नेहमीपेक्षा अधिक आहे काय ?' मी विचारले. 'होय' ते म्हणाले. 'मुंबईहून भावाला बोलावू काय ?' मी विचारले. 'बोलावणे बरे' असे ते म्हणाले. 'माझ्याबरोबर घरी या– औषध देतो' असे सांगताच त्यांच्याबरोबर मी गेलो. औषध आणले. नेहमीप्रमाणे औषधाचा डोस आईच्या पोटात गेला नाही, कॉटवर गुंडाळलेल्या गादीला टेकून ती बसली होती, मान खाली होती. इतके होईतो ६–६॥ वाजले. सौ. विद्या व मामा तांबोशाहून शिमग्याचा नैवेद्य आटोपून आले. दोघानाही आईने पाहिले. 'हु' म्हणाली. गुंडूचा वांद्रा येथील टेलिफोन नंबर शोधण्यासाठी मी बैठे कपाट उघडले. कागदपत्रांची शोधाशोध व घाईघाईने माझे पाहणे आईने टिपले असावे. सहज माझे आईकडे पहाणे झाले. तीही माझ्याकडे पाहत होती. 'गुंडूला फोन करतो. करू काय ?' मी आईला विचारले. 'हो' असे तिने मानेने सांगितले. चि.पपूला पोस्टात फोनसाठी पाठविले. फोनची लाईन नादुरुस्त असल्याचे त्याने सांगितले. 'तार करून ये' मी म्हणालो. पपू तार करावयास गेला. तार बुक करून तो आला. मात्र तारेची लाईन बरोबर नसल्याचे त्याने सांगितले.

सर्दीपासून संरक्षण करणारे बाह्योपचार सुरू झाले. कोणी हाक मारली तर आई 'हंऽऽ म्हणत असे. हे म्हणताना तिचा आवाज खोल व जड येई. रात्री ९–१०–११ केव्हा वाजले ते कळलेच नाही. घरातील इतर मंडळी आपापले अंथरुण घालून त्यावर पडली. खोलीत आई कॉटवर व तिच्या शेजारी जमिनीवर मी चटईवर हातपाय सैल केले. लाईट ऑफ केला. कंदील बारीक करून ठेवला. तेवढ्यातच 'उच्...

उच्...! असा आवाज ऐकताच स्विच ऑन केला. आईची उजव्या मानेवरची शीर नाडीप्रमाणे पूर्वी वरखाली होई ते होणे थांबल्याचे माझ्या लक्षात आले. यापूर्वी सौ. विद्याचे आजोबा, आमचे आप्पा (वडील), यांच्या मृत्यूच्या वेळी मी अतिशय जवळ होतो त्यामुळे मृत्यू केव्हा चोर पावलानी येऊन आपल्या प्रिय माणसाना अलगद घेऊन कसा जातो याची थोडी फार कल्पना होती. सकाळच्या आईच्या शब्दांची आठवण झाली. पुढील प्रवासाची आईची ती निश्चित तयारी होती हे त्यावेळी मात्र कळले नव्हते. गेल्या १७ महिन्यात तिच्या आजाराने कितीतरी वेळा आजच्यापेक्षाही कितीतरी गंभीर चढउतार केले होते. त्यातूनही तिला आमच्या बरोबर ठेवण्यात आम्ही सर्व यशस्वी झालो होतो. आज मात्र तिच्या आजाराने अशी हूल दिली...... अशी हूल दिली की आईला आमच्यापासून वेगळे करण्यात तिचा आजार यशस्वी झाला.

अति सूक्ष्म उचकीचे दोन तीन आचके लागले असतील नसतील इतक्यात माझे धडधडून उठणे व लाईट पेटविणे या प्रकारामुळे सौ. विद्या व संजीव खोलीत दत्त म्हणून हजर ! माझा डावा हात आईच्या मानेच्या खाली होता. उजवा हात तिच्या छातीवर होता. समजावयाचे ते मी समजलो. आईच्या तोंडात तुलसीपत्राचे पाणी घालण्यासाठी मी सौ. विद्येला तुलशीपत्र आणण्यासाठी सांगितले, ती भयभीत झाली. संजीवचे डोळे भरून आले. आकाने आपल्या पदराने आपले डोळे पुसले. 'ताई जाणार नाही.' 'पान आणवत नाही.' असे हुंदका फुटून सौ. विद्या म्हणाली. वस्तुस्थितीत काहीही बदल करता येणार नाही हे माझ्या चेहऱ्यावर पाहताच तिने मा या हातात तुलसीपत्र आणून दिले. पाण्याचा तांब्या तिथेच होता. तुलसीपत्र पाण्यात बुडवून आईच्या तोंडात तीर्थ सोडले, झाले ! गेले १७ महिने माझ्या बिऱ्हाडी आईचे वास्तव्य होते. या बिऱ्हाडाचा सर्व परिसर तिच्या वास्तव्याने भारलेला होता. आज आईच्या जाण्याने माझीच प्राणशक्ती गेली असल्याचे क्षणभर मला वाटले. त्यावेळी रात्रीचे ११-१५ वाजले होते.

रात्री लगेच मामाना तांबोसे येथे स्पेशल गाडीने पाठवून रामकृष्ण सामंत यास आणविले. वाटेत राजाराम पाटकर याना निरोप सांगण्यास सांगितले. दरम्यानच्या मुदतीत मी व घरमालक बांदेकर खासकील वाड्यात हॉस्पिटलजवळ गेलो व सावंत मास्तरना आईच्या निधनाची कल्पना दिली.

सबनिसवाड्यात बचत अधिकारी दत्ताराम बिले यांस भेटलो. टेलिफोन एक्स्चेंज अधिकारी श्री. देसाई यास घेऊन तार ऑफीसमध्ये गेलो. मुंबई सावंतवाडी लाइन नादुरुस्त असल्याचे आढळले. जवळजवळ अर्धा तास पणजीमार्फत मुंबईशी संबंध जोडता येईल अगर कसे याबाबत प्रयत्न करण्यात आले. रात्री १ ते १॥ पर्यंत हे प्रयत्न फसल्यानंतर विठ्ठलमंदिराच्या मागे नगरपालिका मेंबर श्री. रामकृष्ण स्वार यांस झोपेतून उठविले. मृत्युदाखला हवा होता. ते लगेच उठले. तेथून ते दुकानावर आले व लगेच डेथ सर्टिफिकेट त्यानी दिले. रात्री दोन वाजता सरकारी कर्मचारी संघटनेचे नेते श्री. तावडे व इतर कर्मचारी, देसाई गुरुजी वगैरे मंडळी आलेली होती. भटजींना कल्पना देण्यासाठी ठाकूर मास्तर व कशाळीकर गुरुजी गेले. पुढील तयारी शिक्षक संघटना व सरकारी कर्मचारी संघटनेच्या नेत्यानी केली. सकाळी ६॥ वाजता आईला स्नान घातले. तिच्या गळ्यात माझी नामस्मरणाची तुळशीची माळ घातली. तिला लुगडे नेसविण्याचे काम सौ. विद्या हिने केले. चि. पपू व चि. संजीव गप्प एका बाजूस बसले होते. आईच्या देहाचा आता अखेरचा प्रवास सुरू झाला. तिला घेऊन आम्ही उपरलकडे (स्मशानभूमी) निघालो. सोबत ४०–५० माणसे होती. अैनवेळी आईच्या निधनाचे वृत्त समजताच पेडणे (गोवा) येथून आप्पा गव्हाणकर येऊन पोहोचले.

कशाळीकर भटजी स्मशानभूमीमध्ये ठरल्याप्रमाणे ७॥ येऊ शकले नाहीत आत्मेश्वर मंदिरात त्यांचे रुद्राचे काम सुरू असल्याचे समजले. ते यावयास एक तास उशीर झाला. दरम्यानच्या मुदतीत लाकडाच्या कोठारातून सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक वगैरे लोक लाकडाचे ओंडके आणून दहन भूमीवर ठेवू लागले. संघटित शक्तीच्या कार्याचे महत्त्व पटवून देणारा हा क्षण होता. तातू कशाळीकर यानी

येऊन मंत्रोच्चारात देहरूपाने असलेल्या आईच्या शवाला अग्नी देण्याचे काम माझ्यामार्फत पार पाडले. हा क्षण काळजाला अनंत सुयानी टोचणारा असतो. जिने माझ्या पंचावन्न वयापर्यंत माझे रक्षण केले, अगाखांद्यावर लहानपणी खेळविले, सावलीसारखी जी माझ्याबरोबर राहिली तिला अग्नी देताना मनाची जी कालवाकालव होते तिचे वर्णन कोण करील ? त्या क्षणापासून माझ्या सर्व हालचाली यंत्रवत होऊ लागल्या. माझ्या अंगाला लक्षावधी मुंग्यानी बधीर करून टाकले असावे असेच वाटले. तातू कशाळीकरानी पंचात बांधून माझ्याकडे ' अश्मा ' दिला. गेल्या १२ तासात श्वासोच्छ्वास करणारी माझी जिवंत आई, त्यानंतर तिचा निष्प्राण देह व आता माझ्या हातात आलेला ' अश्मा ' या सर्व घटनांकडे पाहताना मी मनातून फाटून गेलो होतो.

•

कृष्णागंगेच्या संगमावर

तिसऱ्या दिवशी ' भरण्याचे काम ' करण्यासाठी तातू कशाळीकरानी मला उपरलच्या स्मशानात नेले. एका छोट्या मातीच्या बुडकुल्यात पाय, ढोपर, खांदे, मस्तक वगैरे भागावरची पिचलेल्या हाडांची राख घालण्याबद्दल भटजीनी मला सांगितले. त्याप्रमाणे करताना ' माती असती मातीत मिळसी आत्म्याला हे लागू नसे ' हे माहीत असूनही माझे डोळे अश्रूनी डबडबले व निरभ्र आकाशातील सूर्यबिंब माझ्या डबडबत्या डोळ्यांच्या पापण्याच्या काठावर आल्याचा भास झाला. गंगायमुना वाहणे म्हणजे काय हे त्यावेळी मला समजले.

४ थ्या दिवशी मी व मामा (रा. शि. सामंत) नरसिंहवाडीस जाण्यास निघालो. आईचा अस्थिकलश मी माझ्या मांडीवर घेतला होता. दोन्ही हातानी तो धरलेला होता. पंचावन्न वर्षापूर्वी बालकाच्या रूपाने मी आईच्या अंगाखांद्यावर खेळलो होतो व आज आईचा रक्षा कलश माझ्या मांडीवर दोन्ही हातात मी धरलेला होता. तिच्या सोवळ्या ओवळ्याची मला कल्पना असल्याने नरसिंहवाडीस

जाईपर्यंत कोणत्याही हॉटेलमध्ये मी गेलो नाही. रात्री ८–९ च्या दरम्यान नरसिंहवाडीस पोहोचलो. बनामध्ये एका ब्राह्मणाच्या घरात राहण्याची आमची व्यवस्था झाली. रक्षाकलश घराच्या बाहेरील भिंतीच्या खोरणीत ठेवण्यास मला सांगितले गेले. आम्ही घरात झोपण्यासाठी लवंडलो खरे पण आई रक्षा कलशाच्या रूपाने बाहेर अडकली असल्याची जाणीव होताच मन उदासीन झाले. या उदासीनतेचा काळोख अमावस्येच्या काळोखापेक्षाही अधिक भीषण वाटला.

सकाळी उठून स्नान केले व अस्थी कलश घेऊन बनातून दत्तपादुकांच्या मागील बाजूने संगमावर जी वाट गेली आहे त्या वाटेने जाऊन कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर मी, मामा व स्थानिक भटजी (वामन भटजी) पोहोचलो. सकाळचे ६॥ वाजले होते. संगमाच्या ठिकाणी विस्तीर्ण व संथ जलाशय होता. पायरीवर मी बसलो. भटजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे विधी पूर्ण होत असताना व पूर्वेकडे सूर्य डोकावत असताना माझ्या हातातील अस्थी कृष्णा पंचगंगेच्या शांत पाण्यात गंगामय झाल्या व आईने शेवटचा निरोप घेतला. आजपर्यंत कित्येक वेळा आईने नरसिंहवाडीस मला आणले होते. लहान असताना ती मंडपात मला बसवून आपण महाराजांच्या पादुकांना प्रदक्षिणा घालत असे. माझ्या वजनाइतके नारळ देऊन महाराजांच्या समोर माझा तुलाभार तिने केला होता. पटकीच्या साथीतही मला व माझ्या थोरल्या भावाला घेऊन ती येथे माधुकरी मागून राहिली होती प्रत्येक क्षणाला आम्हाला जपणारी आई अखेरचा निरोप घेऊन पुढील प्रवासास निघून जात असताना तिला साथी म्हणून याच पाण्यात माझे पाऊल पायरीवरून निसटले असते तर ती संधी मला अमृतयोगासारखी वाटली असती. महाराजांच्या पादुकांचे दुरून दर्शन घेऊन मी व मामा सावंतवाडीस येण्यासाठी नरसिंहवाडीतील माझ्या आईला नमस्कार केला व गाडीत बसून नरसिंहवाडी सोडली.

•

ध्यान मन निवाले; श्री गुरुचरणी !

माता काशीबाई,
असे हो भाविक,
श्रद्धास्थान एक,... दत्तगुरू ।

दत्त असे ध्यानी
दत्त असे मनी;
दत्त वसे स्वप्नी,... ध्यास दत्त ।

दत्त नाम मुखी,
निरंतर वसे,
तया अर्पितसे... भक्तिपुष्प ।

भोजनसमयी,
नैवेद्याचे पान
श्री गुरू अर्पण... न चुकता ।

सर्व संकटांशी
झुंजताना तिने
दत्तनाम स्मरणे... मात केली ।

अंतसमयी तिच्या
तीर्थे कोटी येती
त्रिपुटी पैल तटी भेटी होय ।

गुरुदेव आले,
अंती सांगितले,
ध्यान मन निवाले... श्री गुरुचरणी ।

–स. फ. आजगांवकर

माझी आत्या

–रा. शि. सामंत

आठवण होते ती माझ्या बाळपणाची ! बाळपणात प्रथम पाहिलेल्या माझ्या आत्याची !

'रम्य तें बाळपण देई देवा' असे मला नेहमीच वाटते, तोच माझा विरंगुळा. तेच माझे सुख. बाळपणात सर्वच माणसे बाळाचे कौतुक करतात व बाळाला सर्वतोपरी जपत असतात. त्याचे उत्तम पालन–पोषण करतात. असे करताना मी अनेक लहान मुले पाहिली. त्याचे सुख व आनंद ज्ञानदृष्टीने पाहिले व अनुभवले. परंतु त्यातही स्वतःच्या बाळपणाचा आनंद व सुख काही वेगळेच असते. माझ्या बाळपणातलें हे सर्व सुख मला मिळवून देणारी पहिली बहीण माझी आत्या !

आत्या आज असती तर मला पाहून तिला माझ्यापेक्षा कितीतरी आनंद झाला असता ! मीही त्या आनंदाने भरून गेलो असतो.

आत्या ही आमच्या सर्व भावंडात भाऊंची पहिली मुलगी. भाऊ तिला 'शांतू' म्हणत. असे म्हणताना भाऊंच्या आवाजात त्यांच्या मनाचा एक गोड हळुवार भाव मला दिसत असे. भाऊंची फार आवडती मुलगी म्हणजे माझी आत्या !

आत्या आपल्या वडिलाना 'भाऊ' म्हणत असे. भाऊना तीन मुली व एक मुलगा. पहिली शांता, दुसरी गंगा, तिसरी कमळा व चौथा रामचंद्र उर्फ बाबू. माझ्या आईला 'गजा आक्का' (रुक्मिणी) असे तांबोसे गावचे लोक म्हणत. माझी आई तांबोसे येथील प्रसिद्ध पाटकर घराण्यातल्या दादा पाटकराची मुलगी. आत्या माझ्यापेक्षा सोळा वर्षांनी मोठी. ती पाकशास्त्रात व शिवणकलेत तरबेज होती माझ्या बारशानंतर माझी आई आजारी पडली. त्यानंतर माझी आई तीन वर्षे अंथरुणावर पडून होती.

तत्पूर्वीच आत्याचे लग्न झाले होते. आत्याला आजगावच्या प्रमुख मतकरी आजगावकरांच्या घराण्यातल्या रघुनाथ आजगावकरांच्या मोठ्या मुलाला दिलेली होती. माझ्या आईने आत्याच्या लग्नाचा सोहळा पाहिला होता. माझ्या आईच्या आजारपणामुळे आत्याला तांबोशाला राहणे भाग पडले. माझ्या वयाच्या तिसऱ्या वर्षी माझी आई स्वर्गवासी झाली. त्यानंतर तांबोसे गावी वरचेवर येतजात राहून आत्याने आम्हास सांभाळले.

तांबोसे (तालुका पेडणे, गोवा) हे आत्याचे व माझे जन्मगाव. हे सृष्टीसौंदर्याने नटलेले, नारळ, पोफळ, आंबा, फणस, काजू इत्यादी मोठया झाडांनी, बागायती व शेत जमिनीने व्यापलेले आहे. एका बाजूस एक गोडया पाण्याचा ' कडशी ' या नावाचा ओढा व दुसऱ्या बाजूस खाऱ्या पाण्याची भरती-ओहोटी येत असलेली मोठी नदी आहे, त्यांच्या संगमाने सुजलाम् व सुफलाम् बनलेले हे एक लहानसे नयनरम्य निसर्गसुंदर खेडे आहे. हे आत्याच्या व माझ्या राहण्याचे मुख्य महत्त्वाचे केंद्रस्थान बनले. मी पाच सहा वर्षाचा झाल्यानंतर आत्याने भाऊंच्या मांडकुलीच्या बाया बहिणीकडे शिक्षणासाठी मला नेऊन ठेवले. आत्या आप्पांबरोबर मुंबईला जाऊन राहिली.

मांडकुलीच्या प्राथमिक मराठी शाळेत माझे मराठी तीन इयत्तांचे शिक्षण झाले. माझा वर्गात पहिला नंबर होता. निळसर घाऱ्या डोळयाच्या पिंगुळीच्या धुरी मास्तरानी माझे बालबोध व मोडी हस्ताक्षर पाटीवर व पुस्तीवर (कित्त्यावर) उत्कृष्ट पद्धतीने नमुनेदार तयार करून घेतले. माझ्या पुढील शिक्षणाचा मजबूत पाया, त्याची आवड व ध्येयनिर्मिती ही धुरी मास्तरानी माझ्यात निर्माण केली होती. मी यापुढे फार मोठे शिक्षण घ्यावे असे माझ्या बाया आतेला व आत्याला वाटत असे. मांडकुलीला शाळेतून आल्यावर आत्याने तांबोसे गावाहून भाऊंकडे पाठवून दिलेले फणसाचे दोन तीन सुके गरे किंवा सुकविलेल्या फणसपोळीचा एक लहान तुकडा बाया माझ्या हातावर ठेवीत असे.

बाया आते ही विधवा, वृद्ध व गोरीपान दिसत असली तरी ती एक शिवडी व तरतरीत होती. पांढरे नऊवारी वस्त्र परिधान करणारी, मायेने व प्रेमाने सर्वतोपरी माझ्या बाळपणी मला सुखी करणारी माझी

बाया आते आठवली म्हणजे फिरून बाळ होऊन बाया आतेकडे जाऊन रहावे असे आताही मला वाटते. बायाची सांपत्तिक स्थिती चांगली होती. घरात दूधदुभते भरपूर होते. घराच्या आसपासच्या भागात सुरंगीची पुष्कळ झाडे होती. सूर्य उगवल्यावर सुरंगीच्या फुलांचा सुवास सर्वत्र भरत असे. सुरंगीचे फूल अत्यंत नाजूक, कोमल, पिवळ्या रंगाचे अगदी लहान मनमोहक सुंदर दिसते. सुरंगीच्या फुलांचा सुवासिक सुमधुर सुगंध व विलोभनीय, आकर्षक कोमल प्रफुल्लित सुंदर रूप ही अजूनही माझ्या मनाला फार आनंदीत करतात.

मांडकुलीच्या बाया आतेकडे माझ्या आत्याने माझ्या वयाच्या नवव्या वर्षी मोठ्या उत्तम रीतीने थाटामाटाने माझी मुंज करून घेतली. आत्याने मुंबईहून माझ्यासाठी उत्तम प्रकारचा पोषाक व अलंकार आणले होते. आत्या, आप्पांचे पहिले दर्शन माझ्या ह्या मुंजीत मला घडले असे आता मला वाटते. माझ्या मुंजीत पाहिलेला माझ्या आत्याचा थाटमाट आता मला आठवतो. तो तिचा त्यावेळचा हौशी, उमेदीचा, प्रेमळपणाचा, ऐन तारुण्याचा, सुखासमाधानाचा व आनंदाचा उज्ज्वल काळ होता. आठवतो काळ सुखाचा बाळपणीचा घडी घडी.

माझ्या मुंजीनंतर भाऊ सर्वांगवायूने तांबोऱ्याला आजारी पडले. आत्याने आपल्या गंगा बहिणीचे लग्न केले होते. गंगा बडोद्याला होती. कमळाचे लग्न व्हावयाचे होते आत्याने भाऊंना डोलीत घालून मांडकुलीच्या बायाकडे आणून ठेवले. भाऊंबरोबर कमळाही होती. भाऊंबरोबर राहून पुष्कळ औषधोपचार करून आत्याने भाऊंना साधारण बरे केले. त्या वेळेपासून भाऊ परावलंबी झाले. आमच्या अनुपस्थितीत मांडकुलीची माझी बाया आते स्वर्गवासी झाली. माझा जीवनाधार नाहीसा झाला म्हणून आम्हा सर्वांना फार दुःख झाले.

आत्याने कमळाचे लग्न केले. मळगावच्या बापू वालावलकराला तिने कमळा दिली. आत्याने काही महिने आजगावच्या ढाकोरे गावच्या माझ्या मावशीकडे मला अभ्यासासाठी नेऊन ठेवले. आजगावच्या मराठी शाळेत माझे मराठी चौथीचे शिक्षण झाले.

शिरोडे येथे शांताराम जोशी यांचेकडे राहून टचुटोरियल इंग्लिशस्कूल-मध्ये मी इंग्रजी शिक्षण घेतले त्या शाळेचे हेडमास्तर सुप्रसिद्ध साहित्यिक

वि. स. खांडेकर होते. हे म झे आवडते गुरु व मी त्यांचा एक आवडता गरीब होतकरू ध्येयवादी हुशार विद्यार्थी. त्यांच्या ह्या शाळेत क्रिकेट, आटापाटया, हुतुतू इत्यादी निरनिराळया प्रकारचे खेळ, नमस्कार, दंड उठाबशा, चक्रदंडादि शिर्षासन, लाठी इत्यादी व्यायामाचे प्रकार, इंग्रजी, मराठी, संस्कृत, चित्रकला इत्यादी विषयांचे व उत्तमोत्तम गुणांचे आदर्श शिक्षण खांडेकर गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली मला मिळाले. त्यामुळे माझ्या पुढील शिक्षणात माझी अधिकाधिक प्रगती होत गेली.

शिरोडयाच्या इंग्रजी शाळेत इंग्रजी दुसरीत शिकत असताना शिरोडयाहून वेंगुर्ल्यापर्यंत पहिल्यानेच बोटीने जलप्रवास करून मी पणजीला गेलो. पणजीहून बाफरात (लहान आगबोट) बसून सावर्डे येथे गेलो. तेथे आत्या व आप्पा बाबा पेठेकडे राहत होते. चि. गुंडू व सद्गुरू लहान होते. माझ्यापेक्षा पाच वर्षांनी गुंडू व दहा वर्षांनी लहान सद्गुरू. माझी कमळा बहीण मळगावला गोसाव्याच्या आळीतील आपल्या घरात अंथरूणावर अत्यवस्थ अवस्थेत आजारी होती. आपल्या मोठया बहिणीला– माझ्या आत्याला एकवेळ पाहाण्याची कमळाची अखेरची मोठी इच्छ होती. ही कमळाची इच्छा आत्याला प्रत्यक्ष सांगून मळगावला आत्याला आणण्यासाठी मी सावर्डेला आत्याकडे गेलो होतो. परंतु आतयाला त्यावेळी माझ्याबरोबर मळगावला येता आले नाही. एवढेच नव्हे तर कमळाची ही अखेरची इच्छा अतृप्त राहिली. आत्याच्या ध्यासाने मळगावला कमळा परलोकवासी झाल्याचे मळगावचे पत्र सावर्डेला आत्यालाही मिळाले. आम्हाला फार दु:ख झाले.

माझे इंग्रजी पाचवीपर्यंतचे शिक्षण भाऊ खांडेकरांच्या शिरोडे येथील इंग्रजी शाळेत झाले. त्यानंतर सावंतवाडीस इंग्रजी सहावी व सातवीचे शिक्षण कळसूलकर इंग्लिश स्कूलमधून पूर्ण झाले. भाऊ खांडेकरांनी सावंतवाडी येथे त्यांचे मित्र 'वैनतेय'चे संपादक मे. द. उर्फ आबा शिरोडकर यांचे घरी माझी राहण्याची व्यवस्था केली होती. इ. स. १९३४ च्या जूनच्या पहिल्या आठवडयात बॉम्बे युनिव्हर्सिटीची मॅट्रिकची परीक्षा कोल्हापूर परीक्षा केंद्रातून मी उत्तम रीतीने पहिल्या खेपेस पास झालो. भाऊ खांडेकर, आबा शिरोडकर, माझी आत्या व भाऊ यांना फार आनंद झाला. भाऊ खांडेकरांच्या योग्य मार्गदर्शनामुळे, स्कॉलरशिपच्या

व विद्यार्थ्यांच्या सहाय्याने कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये माझे इंटरपर्यंतचे शिक्षण पार पडले.

त्यावेळी आत्या व भाऊ बांद्याला होती. भाऊंची प्रकृती बरी नव्हती. मी नोकरी करावी असे आत्याला वाटत होते. आत्या व भाऊ यांच्या-साठी मी माझे कॉलेजचे दोन वर्षाचे बी. ए. चे शिक्षण शिक्षकाची नोकरी करून पूर्ण करण्याचे ठरविले. मी बांद्याला ' खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूल ' मध्ये रुपये तेरा अधिक चार महागाई भत्ता मिळून सतरा रुपये मासिक पगारावर सावंतवाडी संस्थानची सरकारी शिक्ष-काची नोकरी स्वीकारली. तो इ. स. १९३८ चा काळ अत्यंत स्वस्ताईचा होता. सहा रुपयाना रंगूनच्या तांदळानी भरलेली एक गोण मिळत असे. दोन आण्याला एक पौंड जाडी साखर मिळत असे. दोन पैशाना चार माणसाना पुरेल एवढी भाजी मिळत असे. दोन रुपयाना शंभर नारळ मिळत होते. त्यावेळी आत्याचा पहिला मुलगा गुंडू न्हयच्या आडीस मराठी चार इयत्तांच्या शाळेत शिक्षक होता. रजेत पुष्कळ वेळा बांद्या-हून सायकलने पाडलोस–कोंडुरा मळेवाड–आजगाव–शिरोडा–आरवली टाक वरून न्हयच्या आडीस मी गुंडूकडे जाऊन एक दिवस राहत असे व परत बांद्याला येत असे. त्याचप्रमाणे बांद्याहून पुष्कळ वेळा मी एकटा किंवा आत्याबरोबर तांबोशालाही जाऊन येत असे. तांबोशाहून घरच्या उत्पन्नापैकी भात, नारळ, कुळीथ, काजू, फणस, आंबे इत्यादी वस्तू घेऊन मी बांद्यास येत असे.

बांद्याला भाऊ फार आजारी पडले. त्यांचे शेवटचे चार महिने भ्रमिष्टावस्थेत गेले. मी व आत्याने त्यांची सेवाशुश्रूषा व औषधोपचार उत्तम प्रकारे केली. दिनांक १९–८–४० रोजी ती. भाऊ बांदे येथे स्वर्गवासी झाले. मला कोणाचा ' आधार ' नाही म्हणून ते आमच्यामधून कायमचे निघून गेले. अशा प्रसंगी मला धीर देणारी माझी आत्या !

कोणत्याही ठिकाणी काही जरुरीच्या कामासाठी काही काळ आत्या राहिलेली असली तरी ती आपला ठराविक धार्मिक नित्यक्रम कधीही चुकवीत नसे. तांबोसे येथे असताना सकाळी आंघोळ केल्यावर तुळशीला पेल्याने पाणी घालून शिवलीलामृताचा पाठ म्हणत हातात जपमाळ घेऊन ती तुळशीला प्रदक्षिणा घालीत असे. गंधाक्षता लावून व फुले

घालून ती तुळशीची पूजा करीत असे. सूर्याला अर्घ्य देऊन ती सूर्य पूजाही करीत असे. पितळेच्या एका लहान बशीसारख्या दिसणाऱ्या वाटोळ्या थाळ्यात स्टेनलेस स्टीलच्या पेल्यातून किंवा स्वच्छ पांढऱ्या कपबशीतून किंवा पितळेच्या पेल्यातून दिवसातून ठराविक दोन तीन वेळा चहा घेत असे. चहाबरोबर काहीतरी पदार्थ ती घेत असे. दुपारच्या जेवणाच्या वेळी अग्नीची पूजा करून अग्नीला काही अन्न अर्पण करीत असे. घराबाहेर असणाऱ्या कुत्र्याला व कावळ्याला अन्नपदार्थ पानावर वाढून त्यांच्या पुढ्यात ती प्रथम नेऊन ठेवीत असे. घरात स्वयंपाक खोलीत मांजराला एका ठराविक पेल्यातून पाणी ठेवून मांजराला आवडणारे अन्न ती भांड्यातून ठेवीत असे. पैपाहुणा किंवा कोणीही अतिथी दुपारच्या वेळी तिच्याकडे आगंतुक आला असला तरी जे काही घरात भोजन तयार केलेले असेल त्यापैकी त्या आलेल्या व्यक्तीला घालीत असे. त्या व्यक्तीने जेवण घेतले नाही तर चहा व खाऊ देऊन घरातला एक नारळ किंवा काहीतरी योग्य वस्तू भेट म्हणून देत असे. स्वतःही रिक्त हस्ताने कोणाकडेही गेली नाही. किंवा कोणीही तिच्या घरी आला तर त्या इसमाला सन्मानाने वागवीत असे. संध्याकाळच्या कातरवेळी तुळशीला घराच्या आसपासचा भाग–परिसर संभाळणाऱ्या देवाला आठवड्यातून सोमवारी संध्याकाळी एकवेळ व घरातल्या देवाला नेहमी निरांजन किंवा लामण दिवा यातून दिवा लावून ठेवीत असे. दररोज संध्याकाळी सात आठ वाजण्याच्या वेळी श्री दत्तमहाराजांचे स्तुतिस्तोत्र स्वतः म्हणत असे व आमच्याकडूनही म्हणवून घेत असे. ' धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ' इत्यादी म्हणून झाल्यावर श्रीदत्त-महाराजांची व इतर देवांची आरतीही आमच्याकडून करून घेत असे. असे करून घेताना तिचा चेहरा प्रसन्न दिसत असे. दूध साखर व मध घालून तयार केलेले तीर्थ आत्या देवाला अर्पण करीत असे. बारीक किसलेले सुके खोबरे, गूळ किंवा साखर लावून देवाच्या पुढ्यात ठेवून ती प्रथम देवाला अर्पण करीत असे. आत्या आमच्या सर्वांच्या हातावर देवाचा तीर्थप्रसाद देत असे. सर्वांना जेवायला वाढल्यावर व सर्वजण तृप्ततेने जेवून उठल्यावर सर्वांच्या शेवटी स्वतः जेवायला बसत असे.

प्रत्येक आठवड्यातील सोमवार, गुरुवार व शनिवार या दिवशी संध्या-सकाळी एक वेळ आत्या उपवास करीत असे. प्रत्येक महिन्यातून एक वेळ येणारी संकष्टचतुर्थी ती स्वत: एक वेळ उपवास करून संध्याकाळी गणपतीची यथासांग पूजा, आरती, तीर्थप्रसाद, सर्व देवाना नैवेद्य दाखवून चंद्रदर्शन घेत असे. ती स्वत: सर्व घरकाम करीत असे. कधीतरी ती माझ्याकडूनही संकष्टचतुर्थीची पूजा करून घेत असे. ती अशावेळी नऊवारी सोवळे वस्त्र नेसत असे. तांबोश्याच्या देवाचे नैवेद्य, वार्षिक विविध प्रकारचे सण व धार्मिक विधीची कामे ती स्वत: न विसरता करीत असे किंवा करून घेत असे.

आत्याचा संसार व्यवस्थित टापटिपीचा होता. तिला स्वच्छता व जिथल्या तिथे वस्तू ठेवलेली आवडत असे. तांबोसे येथे ती फार काळ एकटी स्वावलंबीपणाने, स्वतंत्रतेने आणि निर्भयपणाने राहिली. वैभवात व सुखसंपन्नतेत असलेल्या गुंडू-सद्गुरूकडे किंवा माझ्याकडे माझी आत्या येऊन राहिली नाही. ती बाणेदार, स्वतंत्रवृत्तीची, स्वाभिमानी, उदार, अंत:करणाची, दीर्घोद्योगी, सहनशील, अत्यंत प्रामाणिक, हुषार व धीराची होती. तिची राहणी अगदी साधी होती. ईश्वरावर तिची मोठी श्रद्धा व भक्ती होती. तिच्याजवळ सर्व वस्तूंचा मोठा संग्रह असे. गुंडू जेव्हा आत्याकडे येई तेव्हा तो माझ्या आत्याला सहा महिने किंवा वर्षभर पुरेल एवढ्या सर्व प्रकारच्या जरुरीच्या वस्तू विकत घेऊन ठेवीत असे. शिवाय तिला दरमहा शंभर रुपये गुंडू मनिऑर्डरने पाठवीत असे. आत्याचे दोन अत्यंत लाडके मुलगे म्हणजे गुंडू-सद्गुरू. परंतु 'पहिलो माझो बाबू व नंतर तुम्ही' असे माझी आत्या गुंडू-सद्गुरूना वरचेवर सांगत असे. 'गावचो पाडो कुठेही वाढो!' असे माझ्याविषयी म्हणणाऱ्या माझ्या आत्याने आयुष्यभर माझ्यावर मन:पूर्वक निरपेक्ष प्रेम केले!

●●

तुलसीप्रदक्षिणेच्यावेळी आई म्हणत असलेल्या ओव्या

व्यास सांगे जनमेजयालागून ।
कथा सांगे पुण्यपावन ।।
तुलसी देवीचे आख्यान ।
एकचित्ते श्रवण करावे ।।

तुलसीवृंदावन जयाचे द्वारी ।
धन्य धन्य तो प्राणी संसारी ।
तयाच्या पुण्या नाही सरी ।
ऐके राया ।।
नित्य जो तुलसीस नमस्कारी ।
त्यासी देखोनी यम पळे दूरी ।।
विष्णुदूत आदर करी ।
तया प्राणियासी ।।
जे प्राणी तुलसीपूजा करिती ।
तुलसीसंगे घडे श्रीहरीची भक्ती ।।
हे वार्ता आहे निश्चिती ।
असत्य न म्हणावे ।।
तुलसी देवीची मंजीरी ।
अर्पियेली श्रीकृष्णाचे शिरी ।।
धन्य धन्य तो प्राणी संसारी ।
ऐसे वदे व्यास ऋषी ।।
तुलसीपत्र घाली कानी ।
तयांचे पातकांची होय धुनी ।।
तो माझा भक्त म्हणे शारंगपाणी ।
मज आवड तयाची ।।
तुलसीवृंदावनींची मृत्तिका ।
जो कपाळी लावी तिलका ।।
तो भक्त माझा निका ।
म्हणे श्रीकृष्ण ।।
जे तुळसीची माळा ।
प्राणी घालिती गळा ।।
मी स्वरूप सावळा ।
आहे तेथे ।।
नित्य करी तुलसीपूजन ।
स्मरणे संतोष पावे श्रीकृष्ण ।।

तेणे होय सुखसंपन्न ।
धन्य धन्य भक्त माझा ॥
तुलसी वनीचे झाड म्हणती ।
ते झाड नव्हे विष्णूमूर्ती ॥
श्रीकृष्ण म्हणे उद्धवाप्रती ।
शुक ऐसे सांगतसे ॥
जो तुलसी पूजी नित्य काळी ।
मी त्यांचे बालक तो माझी माऊली ॥
तळ हाताची साउली ।
म्यां केली त्यावरी ॥
तुलसीची आणि माझी प्रीती ।
तुलसीपूजन ज्या नारी करिती ॥
चिरंजीव तयांची संतती ।
अखंड सौभाग्य तयांसी ॥

भारतांतील शास्त्रांचा उद्गम व विकास

(मानस् सामाजिक मूलाधार आणि आज घ्यावयाचे धडे)

ले.– डॉ. पंढरीनाथ प्रभू

पृष्ठे ३१६+२० खास सवलतीची किं. ४१ रु. ट. ख. ५ रु.

भाव माझ्या अंतरीचे

कविता संग्रह

किं. ५ रु.

इतर पुस्तकांचा कॅटलॉग मागवा.

पत्ता– **गं फ. आजगांवकर**

१७ कुडाळ देशकर गौ. ब्रा. निवास

मॅजेस्टिकसमोर, गिरगाव, मुंबई ४०० ००४

फोन : २९४२९२ : ३२४६३४

उभे : श्री. गुं. फ., श्री. स. फ..व प्रा. विजयकुमार मानकर (सिद्धार्थ कॉलेज)
बसलेल्या : श्रीमती शांताबाई आजगांवकर (मातोश्री)



लेखक :
स. फ. आजगांवकर
सेवानिवृत्त
वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी

संपादक :
गु. फ. आजगांवकर

कै. फ. र. प्रभू
संपादक " प्रणाम "
(आजगांव)